**सुविचार**
यदि आपको अपने ही अन्दर शान्ति नहीं मिल पाती तो भला इस विश्व में कहीं और कैसे पा सकते हैं ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२९१ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## देशातील पहिली एअर ट्रेन दिल्लीत सुरू होणार

नवी दिल्ली : विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने भारताने एक पाऊल पुढे टाकले आहे. भारतातील पहिली एअर ट्रेन येत्या काळात दिल्लीविमानतळावर सुरू होणार आहे. राजधानी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या विमानतळांपैकी एक आहे.

दिल्ली विमानतळावरून दररोज हजारो प्रवासी विमानातून प्रवास करतात. यामध्ये मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय प्रवाशांचा समावेश आहे, ज्यांच्याकडे कनेक्टिंग फ्लाइट असते किंवा जे विमानतळाच्या टर्मिनल १ वर पोहोचतात आणि नंतर टर्मिनल २ किंवा ३ वर जाण्यासाठी रस्तेमार्गाचा वापर करतात. मात्र आगामी काळात अशा प्रवाशांना एअर ट्रेनमधून एका टर्मिनलवरून



दुस-या टर्मिनलवर सहज जाता येणार आहे.

दिल्लीतील एअर ट्रेनचा रुट कसा असेल?

एअर ट्रेन सुरू झाल्यास विमान (पान ७ वर)

## अमित शहांसोबत मध्यरात्रीपर्यंत खलबते

छत्रपती संभाजीनगर : - विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने भारतीय जनता पक्षाने मायक्रो प्लॅनिंगसाठी विभागवार बैठका सुरू केल्या आहेत. मात्र महायुतीची चर्चा अजूनही जागावाटपावरच अडून बसली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत संभाजीनगरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बुधवारी मध्यरात्रीपर्यंत खलबतं सुरू असल्याची माहिती आहे.

राज्यातील २८८ मतदारसंघांबाबत या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीतील तपशील काही समोर आला नाही. मात्र जागा वाटपाबद्दल सामंजस्याने चर्चा सुरू असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रात्री दीडच्या सुमारास विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

महायुतीमध्ये सर्वाधिक जागांची मागणी भाजपकडून होत आहे. भाजपने १५५-१६० जागा लढाव्यात आणि उर्वरित जागांमध्ये शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गटाने लढावे असे भाजप नेत्यांचे मत आहे. तर महायुतीतील मित्र पक्षांना तिन्ही प्रमुख पक्षांनी आपापल्या जागांमधूनच तिकिट देण्याचेही सूत्र ठरले असल्याचे म्हटले जाते.

अजित पवार यांच्या महायुतीतील प्रवेशापासून भाजपचे कार्यकर्ते नाराज असल्याची चर्चा आहे. महायुतीची सत्ता आल्यानंतर सत्तेतील अधिकाधिक वाटा मिळवायचा असेल तर जागाही जास्त जिंकून आल्या पाहिजेत, हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना माहीत आहे. त्यामुळे ते बार्गेनिंग पॉवर वाढवत आहेत. त्यांनी नेमकी किती जागांची मागणी केली हे समोर आले नाही. मात्र ६० ते ७० जागांची मागणी अजित पवार गट करत असल्याची चर्चा आहे. बैठकीतून सर्वांत आधी अजित पवार हेच बाहेर पडले होते.

भाजपने १५०-१५५ जागा लढल्या तर साधारण १३०जागा शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या वाट्याला येतात. त्यामुळे या दोन्ही पक्षांना किती जागा द्यायच्या यावरून मोठा खल झाल्याचे समजते. सध्याच्या विधानसभेत शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ९४ आमदार आहेत. त्यामुळे १३० ते १३३ जागांपैकी ३९-४० जागांबद्दलच निर्णय घेणे बाकी आहे. महायुतीमध्ये अजित दादांच्या राष्ट्रवादीला किती जागा सोडायच्या यावरच सर्वाधिक चर्चा सुरू आहे. शिवसेना शिंदे गटाला मुंबई, मराठवाडा आणि कोकणात सर्वाधिक जागा हव्या आहेत. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून पुणे, पश्चिम महाराष्ट्रातून अधिकच्या जागांची मागणी होत आहे. निवडून येण्याची ताकद असलेल्या उमेदवारांची निवड करून लोकसभेत ज्या उणिवा राहिल्या त्यावर तोडगा काढण्याचेही या बैठकीत ठरल्याचे समजते.

## झुकेरबर्ग जगात तिसरा श्रीमंत

नवी दिल्ली : - मेटा प्लॅटफॉर्म्सचा सहसंस्थापक आणि सीईओ मार्क झुकरबर्गची नेटवर्थ २०० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी झाली आहे.



त्यामुळं झुकरबर्गनं जगातील श्रीमंत अब्जाधीशांच्या यादीत वरचं स्थान मिळवलं आहे. मार्क झुकरबर्ग या यादीत तिस-या स्थानावर आहे. तर, दुस-या स्थानी अमेझॉनचे जेफ बेजोस हे आहेत. पहिल्या स्थानी टेस्लाचा संस्थापक एलन मस्क आहे.

ब्लूमबर्ग बिलियनयर इंडेक्सने २५ सप्टेंबरला अब्जाधीशांची माहिती जारी केली, त्यानुसार एलन मस्क २६८ अब्ज डॉलर्ससह पहिल्या स्थानावर आहे. तर, जेफ बेजोसची नेटवर्थ २१६ बिलियन डॉलर्स आहे. तर, तिस-या स्थानी मार्क झुकरबर्ग असून त्याची नेटवर्थ २०० अब्ज डॉलर्स आहे. झुकरबर्ग पहिल्यांदा २०० बिलियन डॉलर्स संपत्ती असलेल्या अब्जाधीशांच्या क्लबमध्ये सहभागी झाला आहे. मार्क झुकरबर्गच्या संपत्तीमध्ये ७१ बिलियन डॉलर्सची वाढ झाली आहे.

जेफ बेजोसची संपत्ती ३९.३ बिलियन डॉलर्स तर एलन मस्कची संपत्ती ३८.९ बिलियन डॉलर्सनं (पान ७ वर)

## भारतीय एके-२०३ रायफलला मुस्लिम राष्ट्रांकडून मोठी मागणी

नवी दिल्ली : - सध्या भारतात तयार होणा-या कलाश्निकोव्ह एके-२०३ असॉल्ट रायफलला मोठी मागणी आहे. खास करुन आफ्रीकी आणि मिडल इस्ट देशातून या रायफलला खूप मागणी आहे. या रायफलची निर्मिती रशिया आणि भारत मिळून होत आहे. इंडो रशियन रायफल्स लिमिटेड द्वारे भारतात या रायफलची निर्मिती केली जात आहे. ब्रह्मोस क्रुझ मिसाईल, आर्टिलरी गन, लाईटवेट टॉर्पेडो सह अनेक शस्त्रास्त्रांसह आता कलाश्निकोव्ह एके-२०३ देखील या मालिकेत रशिया आणि भारत मैत्रीतून तयार केली जात आहे.

रशिया आणि भारतीय संयुक्तपणे तयार करीत असलेल्या कलाश्निकोव्ह एके-२०३ असॉल्ट रायफलची मागणी वाढली आहे. आफ्रीकन आणि मध्य पूर्वेतील मुस्लीम देशांत एके-२०३ असॉल्ट रायफलच्या वाढत्या मागणीला अमेरिका आणि अनेक



पाश्चात्य देश जबाबदार ठरले आहेत. डीफेन्स सेक्टरच्या तज्ज्ञांच्या मते ही वाढती मागणी भारताचे आफ्रीकी आणि मध्य पूर्वेतील देशांशी संबंध वाढवू शकते. तसेच डिफेन्स सेक्टरमध्ये मॅन्युफॅक्चरिंग आणि भारताच्या आत्मनिर्भर मोहीमेला यामुळे उभारी मिळणार आहे.

ही रायफल एके-२०० रायफलीची अत्याधुनिक आवृत्ती आहे. कलाश्निकोव्ह एके-२०३ ची फायरिंग रेंज ४००-८०० मीटर आहे. एका मिनिटाला ही ७०० राऊंड फायर करते. यात डिटेचेबल मॅगझीनचा वापर होतो. मार्चमध्ये या रायफलीच्या सुरुवातीच्या डिलिव्हरी आधीच भारतीय सैन्याने हीच्या चाचण्या केल्या आहेत. या चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. ही विश्वासार्ह रायफल म्हणून ओळखली जाते. हीची अचूक क्षमता वाढण्यासाठी तिला अनेक तांत्रिक बाबी जोडल्या आहेत. ऑप्टीक, कोलीमेटर, नाईट आणि थर्मल इमेजिंग स्कोप लावण्याची सोय देखील आहे. ३.८ किलो वजनाची ही रायफल कोणत्याही वातावरणात निराश करीत नाही. अमेठी येथील कोरवा ऑर्डिनन्स फॅक्ट्रीत आत्मनिर्भर मोहिमेंतर्गत या रायफलची निर्मिती करण्यात आली आहे.

भारतीय एके-२०३ ला मागणी का ?

मध्य पूर्व आणि आफ्रीकी देशात कलाश्निकोव्ह एके-२०३ या रायफलला मागणी वाढण्यामागे अमेरिका आणि पाश्चिमात्य (पान ७ वर)

## बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात देणार भरमसाट नोकऱ्या

नवी दिल्ली : - भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या ग्लोबल कॅम्बिलिटी सेंटर्सने (जीसीसी) गेल्या पाच वर्षांमध्ये झपाट्याने विस्तार केला आहे.

वर्ष २०३० पर्यंत फॉर्च्यून ५०० कंपन्या म्हणजेच जगभरातील टॉप ५०० कंपन्यांपैकी ७० टक्के कंपन्या भारतात विस्तार करतील. नॅसकॉम आणि जिनोव्ह यांनी जारी केलेल्या ङ्घइंडिया जीसीसी लॅण्डस्केप रिपोर्टफ अहवालातून ही माहिती देण्यात आली आहे. भारताचे वाढते वजन, गतिमान आर्थिक विकास, एआय एक्सलन्स सेंटर आदींमुळे या कंपन्या भारतात येण्यास इच्छूक आहेत. (पान ७ वर)

## गॅस कनेक्शन नावावर नसेल तर मोफत सिलिंडर नाही

कोल्हापूर : - घरातील गॅस कनेक्शन महिलेच्या नावावर नसेल तर त्या कुटुंबाला राज्य शासनाने जाहीर केलेल्या अन्नपूर्णा योजनेचा लाभ घेता येणार नाही. केंद्र सरकारच्या उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या व लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असलेल्या अशा दोन निकषांनुसार गॅस कनेक्शनधारकांना वर्षातून तीन मोफत सिलिंडरचा लाभ मिळणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेनंतर महाराष्ट्रात आणखी एक योजना लागू केली असून, पात्र कुटुंबांना वर्षातील तीन एलपीजी गॅस



सिलिंडर मोफत दिले जाणार आहेत. त्याची जाहिरात माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

केंद्र सरकारच्या पंतप्रधान उज्ज्वला योजनेचा आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

असे आहेत निकष गॅस कनेक्शन महिलेच्या नावाने असणे आवश्यक. पंतप्रधान उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन असावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेसाठी पात्र असेल.

एका कुटुंबात (रेशनकार्डनुसार) केवळ एक लाभार्थी पात्र असेल. फक्त १४.२ किलो वजनाच्या गॅस सिलिंडरची (पान ७ वर)

## ९० देशांना भारताकडून शस्त्रास्त्र निर्यात

नवी दिल्ली : - भारताचे संरक्षण उत्पादन २०२३-२४ या आर्थिक वर्षात १.२७ लाख कोटी रुपयांच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचले आहे. आता भारत ९० हून अधिक मित्रदेशांना शस्त्रास्त्र, अन्य लष्करी उपकरणांची निर्यात करत आहे. भारतीय सशस्त्रदल आता भारतात निर्मित शस्त्रास्त्रांचा वापर करत आहे आणि देश जागतिक संरक्षण औद्योगिक पटलावर वेगाने उदयास येत आहे असे उद्गार संरक्षणमंत्री राजनाथ सहिं यांनी काढले.

मेक इन इंडिया कार्यक्रमाला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी ही माहिती दिली. भारताची संरक्षण निर्यात २०२३-२४ मध्ये पहिल्यांदाच २१ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिली आहे. संरक्षण मंत्रालयाने पुढील ५ वर्षांमध्ये हा आकडा वाढून ५० हजार कोटी रुपये करण्याचे लक्ष्य बाळगले आहे. भारत जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या मोठ्या आयातदारांपैकी एक आहे. भारतीय सशस्त्र दलांकडून २०२९ पर्यंत भांडवली खरेदीत सुमारे १३० अब्ज डॉलर्स खर्च होण्याचा अनुमान आहे. केंद्र सरकार आयात शस्त्रास्त्रांवरील निर्भरता कमी करू पाहत आहे. याचमुळे देशांतर्गत संरक्षण उद्योगाला चालना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने देशाला प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीकोनातून मेक इन इंडिया कार्यक्रम सुरू केला होता. (पान ७ वर)

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीला खिंडार

नागपूर : - गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्यात नागपूरमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे. राष्ट्रवादीच्या शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत हा काँग्रेस पक्ष प्रवेश झाला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा प्रवेश झाल्याने आता राजकीय चर्चांना उधाण आले आहे.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जवळपास सर्वच पक्षांनी तयारी केली आहे. या निवडणुकीची घोषणा अद्याप झालेली नाही. तरीही जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. अनेक नेतेमंडळींचा पक्षप्रवेश होताना दिसत आहे. असे असताना राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार राज्यात येईल, असा विश्वास महाविकास आघाडीकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच राज्यभरात विविध पक्षांचे कार्यकर्ते काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेलच्या सरचिटणीस कल्पना मानकर, धनराज फुसे, राष्ट्रवादीचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष अरविंद ढंगरे यांच्या नेतृत्वात राजकुमार जी. वानखेडे, योगेश धनराज फुसे, राजेश कुहीकर, राधेश्याम म्हात्रे, ज्योती सोमकुंवर, संदीप वानखेडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला आहे.

**काँग्रेसच्या नेतृत्वातच प्रगतिशील सरकार**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. महाराष्ट्रात केवळ काँग्रेसच्या नेतृत्वातच प्रगतिशील, स्थिर व मजबूत सरकार मिळू शकते, असे मनोगत प्रवेश करणा-या कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

## एकता फाउंडेशनचे आज राज्यस्तरीय कवी संमेलन

### अध्यक्षपदी धनंजय गुडसूरकर यांची निवड

बीड/प्रतिनिधी- एकता फाउंडेशन च्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसुरकर यांची निवड झाली आहे. २७ सप्टेंबर रोजी शहीद भगतसिंग जयंती दिनी या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील नामवंत कवी यात सहभागी होणार आहेत.

एकता फाउंडेशन च्या वतीने होणारे हे २६वे राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलन आहे. या कवी



संमेलनात प्रसिद्ध कवी वी .रा .राठोड, वीरभद्र मिरेवाड, सुरेश भानप, आदिनाथ बांगर, प्रतिभा ठिगळे, भाऊसाहेब नेटके, परशुराम सोंडगे हे सहभागी होणार असून उद्घाटन अनुराधा प्रकाशनाचे मिलिंद काटे यांच्या हस्ते होणार आहे .

या काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले धनंजय गुडसुरकर हे नामांकित साहित्यिक असून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य आहेत. त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली असून लेखन व साहित्य चळवळ या दोन्ही क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. माहूर येथे झालेल्या मराठवाडा स्तरीय शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, शिरूर अनंतपाळ येथे झालेल्या पाचव्या विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, श्रीक्षेत्र पंढरपूर (पान ७ वर)

## मुरुड अकोला येथील पांडुरंग गडदे यांचे आ.रमेशआप्पा कराड यांच्याकडून सांत्वन



लातूर दि.२६- लातूर तालुक्यातील मौजे मुरुड अकोला येथील भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते पांडुरंग गडदे यांचा मुलगा बांधकाम अभियंता बालाजी पांडुरंग गडदे यांचे गेल्या आठवड्यात रस्ते अपघातात दुर्दैवी दुःखद निधन झाले. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी दुपारी पांडुरंग गडदे यांची मुरुड अकोला येथे निवासस्थानी भेट घेऊन सांत्वन केले.

लातूर ते मांजराकारखाना दरम्यान रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून या रस्त्याच्या कामावर आज पर्यंत अनेक अपघात झाले आहेत. गेल्या २२ सप्टेंबर रोजी रात्रीच्या वेळी बालाजी पांडुरंग गडदे या ३० वर्षाच्या तरुणाचा वाहनाच्या धडकेने दुर्दैवी अंत झाला. मयत बालाजी यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी आणि तीन वर्षाची मुलगी आहे. सदरील दुर्दैवी घटनेची माहिती मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मुरुड अकोला येथे जाऊन गडदे परिवाराचे सांत्वन केले व धीर दिला. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, (पान ७ वर)

## वचनपत्राची अट एसटीकडून मागे

मुंबई : एसटी कर्मचा-यांना वेतनश्रेणी निश्चित करताना जास्त वेतन गेले तर ते परत करावे लागेल, अशा आशयाचे वचनपत्र देण्याची अट आता रद्द करण्यात आली आहे. एसटी महामंडळाने त्याबाबतचे परिपत्रक काढले आहे.

एसटी कर्मचा-यांच्या मागण्यांबाबतच्या चर्चेवेळी मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त प्रसारित करताना केवळ सरकारशी संबंधित काही नेत्यांची नावे टाकण्याच्या अट्टाहासामुळे वचनपत्राचा घोळ झाला. उपस्थित सर्व कर्मचारी संघटनांची नावे तसेच त्यांच्या पदाधिका-यांची नावे इतिवृत्तात असती तर कर्मचा-यांकडून वचनपत्र घेण्याची गरज भासली नसती. वचनपत्र लिहून देण्याच्या सक्तीमुळे कामगारांची विनाकारण फरफट होत असल्याचा आरोप महाराष्ट्र (पान ७ वर)

## मुरुडमधील नुकसानीची आमदारांनी केली पाहणी

लातूर/प्रतिनिधी- लातूर तालुक्यातील मुरुड व मुरुड महसूल मंडळात ढगफुटीसदृश्य पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची लातूर ग्रामीणचे आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी पाहणी केली. येथे पुरपरिस्थिती निर्माण झाल्याने श्री दत्त मंदिरात स्थलांतरित करण्यात आलेल्या नागरिकांची, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची व व्यापाऱ्यांची भेट घेवून त्यांना धीर दिला.

मंगळवारी रात्री अवघ्या चार तासात १०९ मिलीलिटर पाऊस झाल्याने शेतकऱ्याच्या काढणीला आलेल्या आणि काढून ठेवलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहेत. शिवाय, व्यापारी, दुकानदारांच्या दुकानात पाणी शिरल्याने त्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. घरात पाणी शिरल्याने ३०० हून अधिक नागरिकांना श्री दत्त मंदिरात




स्थलांतरित करावे लागले. या सर्व परिस्थितीची पाहणी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केली. स्थलांतरित नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंच्या कीटचेही यावेळी वाटप करण्यात आले. यावेळी लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, मंडळ कृषी अधिकारी योगेश मुळजे, तालुका कृषी अधिकारी दिलीप राऊत, तलाठी कमलाकर आरडले आदींसह काँग्रेस व महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

मुरुड आणि महसूल मंडळात हातातोंडाशी आलेले सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले आहे. काढून ठेवलेले सोयाबीन वाहून गेले आहे. नदी नाल्यालगतच्या पिक व जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना सरसकट भरीव आर्थिक मदत मिळाली पाहिजे. शहरातील अण्णा भाऊ साठे चौक येथील दुकानात पाणी शिरून नुकसान झालेल्या किराना, कापड, फुटवेअर, (पान ७ वर)

दैनिक
# यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४

E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

## सातलिंगप्पा सांगवे यांचे दुखद निधन



अहमदपूर दि.२६(प्रतिनिधी) सातलिंगप्पा सांगवे यांचे दुखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, यशवंत विद्यालयाचे सहशिक्षक शिवरुद्र सांगवे यांचे वडील सातलिंगप्पा संगप्पा सांगवे यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने दि २६ रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या मूळ गावी राहत्या घरी दुखद निधन झाले.

दि.२६ रोज गुरुवारी सायंकाळी ६ वाजता त्यांच्या मूळ गावी काळेवाडी तालुका रेनापुर येथील फार्म हाऊस मध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम सस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा,सून, दोन नातवंडे, असा परिवार असून यशवंत विद्यालयाचे सहशिक्षक शिवरुद्र सांगवे यांच्या पिताश्री होत. त्यांच्या दुखद निधनामुळे सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## मराठा आरक्षणासाठी पती-पत्नीचा विषारी औषध प्राषण करून आत्महत्तेचा प्रयत्न

### मनोज जरांगे पाटील यांनी ६ वेळा उपोषण करुनही दखल न घेतल्याने उचलले टोकाचे पाऊल

अहमदपूर दि.२६(बालाजी कारामुंगीकर): मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी ६ वेळा उपोषण करुनही सरकारने दखल न घेतल्याने पती-पत्नीने विषारी औषध प्राषण करुन आत्महत्तेचा प्रयत्न केला आहे.

याबाबत एमएनसी नुसार मिळालेले सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील हासरणी येथील ज्ञानोबा तिडोळे व चंचलाबाई तिडोळे या पती पत्नी यांनी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी ६ वेळा उपोषण केले., मात्र उपोषण करूनही सरकारने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही. तसेच मराठ्यांना आरक्षण दिले नाही, याच नैराश्यातून पती-पत्नीने दि २५ सप्टेंबर रोजी बुधवारी विषारी औषध पिऊन हे टोकाचे पाऊल उचलत आत्महत्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान वेळीच त्यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असुन सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

अहमदपूर तालुक्यातील हासरणी येथील रहिवाशी अस-





लेले ज्ञानोबा मारोती तिडोळे व चंचलाबाई ज्ञानोबा तिडोळे या पती पत्नी यांनी मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठी समाजाला आरक्षण मिळण्यासाठी मागील वर्षात पाच वेळा आंदोलने केली होती परंतु काही आरक्षण मिळाले नाही. त्यातच जरांगे पाटील हे अंतरवली सराटी येथे दि १७ सप्टेंबर रोजी आरक्षणासाठी सहाव्यांदा आमरण उपोषणासाठी बसले होते जरांगे पाटील यांना समर्थन देण्यासाठी तालुक्यातील हंगारगा येथील जयराम पवार हे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अहमदपूर येथे आमरण उपोषणास बसले असत या आमरण उपोषण आंदोलनात ज्ञानोबा तिडोळे सहभागी होते ते नेहमीच मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय असायचे दि.२५ सप्टेंबर रोजी बुधवारी अंदाजे ८ : ३० ते ९ : ०० च्या दरम्यान मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सोडल्याची माहीती कळताच सहा वेळा उपोषण करूनही सरकारने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही.

तसेच मराठ्यांना आरक्षण दिले नाही, आता आपल्या अकरावीत शिकत असलेल्या मुलीचे तसेच दोन लहान मुलांचे आता कसे होईल याच नैराश्यातून आपली बहीण इंदुबाई तुकाराम हेंडगे चुलत भाऊ व इतर नातेवाईकांना फोन करून आपण मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करीत आहोत असे सांगुन पती-पत्नीने दि. २५ सप्टेंबर रोजी बुधवारी संध्याकाळी ९ : ०० वाजण्याच्या दरम्यान विषारी औषध पिऊन हे टोकाचे पाऊल उचलत आत्महत्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान वेळीच त्यांना अहमदपूर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करून प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना देशमुख हॉस्पीटल या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असुन सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र दोघांचीही प्रकृती चिंताजनक असुन त्यांच्यासाठी सुरवातीचे ४८ तास महत्वाचे असल्याचे डॉ.धिरज देशमुख यांनी सांगितले आहे.

## कुमठा येथे रविवार दि. २९ रोजी मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा नेत्ररोग-मोतीबिंदू व रक्त-लघवी-ई.सी.जी तपासणी शिबिर

अहमदपूर दि.२६(बालाजी कारामुंगीकर) येथुन जवळच असलेल्या कुमठा येथे रविवार दि. २९ रोजी मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा नेत्ररोग-मोतीबिंदू व रक्त-लघवी-ई.सी.जी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर द्वारा संचलित धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर यांच्या वतीने जिल्हा परिषद प्रशाला,कुमठा,ता:-अहमदपूर येथे रविवार,दिनांक:-२९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठीक १०.३० ते दुपारी ०४.३० या दरम्यान मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा नि:शुल्क मोतीबिंदू व रक्त-लघवी-ई. सी.जी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब जाधव; अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय-कार्यसम्राट आमदार बाबासाहेब पाटील; सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता सुभाष भगवानराव पाटील यांच्यासह राजकीय,



सामाजिक,आरोग्य-वैद्यकीय, शैक्षणिक, सहकार, ईत्यादी क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये विविध चिकित्सा पद्धतीचे तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर्स वातविकार, संधिवात, आमवात, आम्लपित्त, मधुमेह, त्वचा विकार, कान-नाक-घसा चे आजार, हृदयरोग, पोटाचे विकार, लहान बालकांचे आजार व स्त्रीयांचे विकार-मासिकपाळी, स्तन व गर्भाशयाचे आजार, मानसिक आजार, कर्करोग, अस्थिरोग,यकृताचे विकार, वंध्यत्व व लैंगिक समस्या इत्यादी आजारांच्या रुग्णांवर आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार व मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरामध्ये नोंदणी केलेल्या महिलांची मोफत (नि:शुल्क)कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नि:शुल्क (मोफत) केली जाईल आणि तसेच प्रसुती (बाळंतपण) व गर्भाशयासंबंधीत विकारांची शस्त्रक्रिया तथा अपेंडिक्स, हर्निया, हायड्रोसिल, मुळव्याध व भगंदर या शस्त्रक्रिया अल्प(५०% सवलत) दरात धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, श्रीकृष्ण मंदिरासमोर, देगलूर रोड, उदगीर येथे केली जाणार आहे.

शिबिरामध्ये लॉयन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या सहकार्याने मोफत नेत्ररोग तपासणी करून मोतीबिंदू आजाराचे निदान झालेल्या व नोंदणी केलेल्या व्यक्तींवर अल्प दरात औषधोपचार व शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार आहेत.

तरी या मोफत शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,अहमदपूर चे संचालक मंडळ तथा धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर चे प्राचार्य,सर्व डॉक्टर्स व शिक्षकेत्तर-रुग्णालयीन कर्मचारी यांनी केले आहे.

## जि. प. कें. प्रा. शाळा झरी बु. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय समिती पदाधिकाऱ्यांचा सत्कार

अहमदपूर दि.२६(बालाजी कारामुंगीकर) येथुन जवळच असलेल्या जि. प. कें.प्रा. शाळा झरी बु. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय समिती पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन अभियानामध्ये झरी बु. येथील जि. प. कें. शाळेने जि. प. गटातुन चाकुर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला त्याबद्दल झरी बु. येथील ग्रामस्थांच्या वतीने शाळेतील मुख्याध्यापक सर्व शिक्षक,



शालेय समितीचे अध्यक्ष अश्विनीकुमार शिंदे व सदस्य यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी शाळेच्या प्रगतीबद्दल कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष अश्विनीकुमार शिंदे, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच अजितदादा खंदारे, कृषिउत्पन्न समितीचे संचालक राहुल सुरवसे, ग्रामविस्तार अधिकारी पाईकराव सुरेश, ग्रामपंचायत सदस्य सिद्धेश्वर येन्ने, विनायक खंदारे, महादेव वाडकर, शिवाजी सुगावकर, दयानंद गव्हाणे, शादुल तांबोळी, अरुण पाटील, रमाकांत जोशी, मंगेश पाटील, तानाजी सुरवसे, नवनाथ चंद्रपटले, लक्ष्मण घायाळ, रहेतुल्ला पठाण आदिंची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विद्याधर माने यांनी केले. सुत्रसंचलन दिपक खलसे यांनी तर उपस्थितांचे आभार ऋषिकेश कोलबुदे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत पु. अहिल्यादेवीच्या विद्यार्थ्यांचा दबदबा

अहमदपूर दि.२६(बालाजी कारामुंगीकर) जिल्हास्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत पु अहिल्यादेवीच्या विद्यार्थ्यांचा दबदबा निर्माण केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील सांगवी सु येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच संत तुकाराम नॅशनल मॉडेल्स स्कूल जलतरण तलाव हरंगुळ , लातूर येथे संपन्न झालेल्या पावसाळी जलतरण स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन करत शाळेचा दबदबा निर्माण केला. १४ वर्षे वयोगटात फ्रीस्टाइल पोहण्याच्या स्पर्धेत सूर्यवंशी रोहन दयानंद हा प्रथम आला असून याच वयोगटात बॅक स्ट्रोक १०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत सूर्यवंशी रोहन दयानंद हाच पुन्हा प्रथम आलेला आहे.१७ वर्षे वयोगटात फ्रीस्टाइल ८०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत चव्हाण बालाजी सुभाष द्वितीय आला असून याच वयोगटात याच स्पर्धेत राठोड अमोल अंगद हा तृतीय आलेला आहे. तर या वयोगटात १०० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये राठोड अमोल अंगद द्वितीय आला असून २०० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत चव्हाण बालाजी सुभाष प्रथम आलेला आहे. तर १९ वर्षे वयोगटात फ्रीस्टाइल १५०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत चव्हाण रामेश्वर विश्वनाथ प्रथम आला असून १०० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये चव्हाण रामेश्वर विश्वनाथ हा प्रथम आलेला आहे तर १९ वर्षे वयोगटात ४÷१०० रिले स्पर्धेत अहिल्यादेवी चा चमू सर्वप्रथम आला आहे या चमूमध्ये चव्हाण रामेश्वर, चव्हाण बालाजी, राठोड अमोल, चव्हाण प्रदीप आणि चव्हाण आशिष या विद्यार्थ्यांनी सांघिक कार्य करत प्रथम क्रमांक पटकाविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्रशिक्षक रेड्डी प्रदीप यांचे संस्थेचे अध्यक्ष गणेश दादा हाके पाटील, सचिव प्राचार्य रेखा तरडे- हाके संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. मानसी हाके, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख रमाकांत खंदारे आदींनी अभिनंदन केले.

## हाडोळती येथे आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धा संपन्न

हाडोळती २६(नागसेन गायकवाड) क.तु.पवार महाविद्यालयामध्ये आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धा संपन्न झाल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रा.पी.टी. पवार सरांच्या अमृतमहोत्सवी वर्ष व कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती यांच्या संयुक्त विद्यमाने अंतर महाविद्यालयीन तायक्वांदो ( मूले - मूली ) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपकजी बच्चेवार सर , तर



उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ.भास्कर माने सर हे उपस्थित होते.तर प्रमुख पाहूणे म्हणून विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील ङ्ग ब ङ्ग झोनचे सचिव डॉ.तात्याराव केंद्रे , निवड समिती सदस्य डॉ.गोविंद कलवले, डॉ. माधव कदम, डॉ. अशोक चाटसे यांनी उपस्थित राहून कार्य केले. योवेळी या स्पर्धेमध्ये २२ महाविद्यालयांतील खेळाडूनी भाग घेतला होता.यावेळी संस्था अध्यक्ष आमचे प्रेरणास्थान प्रा.पी.टी. पवार सर तसेच सचिव डॉ. निलेश भैय्या पवार यांनी विजेते खेळाडूंचे सत्कार करून कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बालाजी भंडारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.गोविंद शिळे यांनी मानले.यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून सहकार्य केले.

मनाचे सौंदर्य हेच खरे सौंदर्य

दैनिक यशवंत नियमित वाचा

## क.तु.पवार महाविद्यालयामध्ये एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

हाडोळती २६(नागसेन गायकवाड) क.तु. पवार महाविद्यालयामध्ये एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाचा रौप्य महोत्सवी वर्ष व आदरणीय प्रा. पी.टी.पवार सरांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती यांच्या संयुक्त विद्यमाने लोकप्रशासन विभागाद्वारे भारतीय संविधान आणि प्रशासन: उद्देश आणि साध्य या विषयावर एक दिवसीय अंतर विद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.०८ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयात करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. पी.टी.पवार सर हे उपस्थितीत राहणार आहेत.

तसेच या परिषदेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे. तर बीजभाषक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ,हैदराबाद येथील लोकप्रशासन विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.पल्लवी काब्दे हे उपस्थित राहणार आहेत .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. निलेश भैय्या पवार, माजी कुलगुरू डॉ. मधुकर गायकवाड, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संतराम मुंडे, लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. मोहम्मद शेख उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत *फभारतीय संविधान आणि प्रशासन: उद्देश आणि साध्यफ* या विषयावर संबंधित विषयातील तज्ञांचे विविध सत्रात मार्गदर्शन होणार आहे. या परिषदेसाठी विविध राज्यातील प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक सहभागी होणार आहेत.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.दीपकजी बच्चेवार, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. कोनेरू डुमलवाड आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आधी पुढाकार घेऊन कार्य करीत आहेत.

## राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे यांचा सन्मान



अहमदपूर दि.२६(बालाजी कारामुंगीकर) राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे या अहमदपूर येथे आल्या असता त्यांचा राष्ट्रवादी युवती काँग्रेस च्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी महीला काँग्रेस च्या जिल्हाध्यक्षा मिनाक्षीताई शिंगडे युवती जिल्हाध्यक्षा साक्षी कांबळे युवती तालुकाध्यक्षा सौ. सुप्रीयाताई चंद्रशेखर भालेराव, सचिव सावित्रा मेकलेवाड शहराध्यक्ष शिवानी कदम कार्याध्यक्ष संगिता सोमवंशी साक्षी जाधव यांच्यासह माजी नगरसेवक रहीमखान पठाण अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबूभाई रुईकर शेख अय्याजभाई सोशल मिडीयाचे जिलानीभाई शेख हूसेनभाई मनियार पाशाभाई मेजर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कबीरवाणी

**कबीर जीवन कछू नहीं,**
**खिन खारा खिन मीठ ।**
**काल्हि अलहजा मारिया,**
**आज मसाना दीठ ।।**

**भावार्थ:** संत कबीर सांगतात की, मानवाला ह्याचे ज्ञान आवश्यक आहे कि या जीवनात काही अर्थ नाही. याच जीवनात क्षणाक्षणाला अनुकुलता व प्रतिकुलतेमुळे आंबट-गोड अनुभव प्रत्येकांच्या जीवनामध्ये येत असतात. ज्या वीराला काल ठार मारण्यात आले हाते. तो आज स्वतः स्मशानात पडलेला दिसत आहे. यामुळे संत कबीरांनी खुप सुक्ष्म निरिक्षण करुन हा दोहा लिहिला आहे. मानवाला किती जिवन मिळाले याला अर्थ नाही. या जीवनात त्यांनी कोणते कर्म केले, किती कर्म केले याला महत्त्व आहे. जीवनाची सुरुवात झाली आहे म्हणजेच हे जीवन कधी न कधी संपणार आहे. मात्र आपल्या कर्माच्या बळावर आपण या जीवनाचे सोने करु शकतो. म्हणुन जीवनाला जरी अर्थ नसला तरी चांगल्या कर्मामुळे आपण सदैव स्मरणात राहु शकतो.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
मो. ९८२३११२९०७

यशवंत
शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४
३
धाराशिव जिल्हा
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## तेर येथे पर्यटन दिनानिमित्त हेरिटेज वॉकचे आयोजन

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन जनजागृती संस्थेच्यावतीने धाराशिव तालुक्यातील तेर येथे हेरिटेज वॉकचे आयोजन दि.२७ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे.
धाराशिव तालुक्यातील तेर येथील त्रिविक्रम मंदिरापासून हेरिटेज वॉकची सुरुवात होणार असून यानिमित्ताने तेर येथील ऐतिहासिक वारसा पर्यटकांना माहिती व्हावा, पर्यटकांपर्यंत पोहोचावा आणि जिल्ह्याचे पर्यटन वाढावे या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील पर्यटन प्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पर्यटन जनजागृती संस्था मागील अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास होऊन जिल्ह्यात पर्यटन व्यवसाय वाढावा या हेतूने अनेक कार्यक्रम, उपक्रम आयोजित करत आहे. तेर येथे असलेला ऐतिहासिक दुर्मिळ ठेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या हेरिटेज वॉक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याची सुरुवात त्रिविक्रम मंदिरातून होणार असून तीर्थकुंड आणि चैत्यगृह या दोन्ही ठिकाणापर्यंत हा हेरिटेज वॉक असणार आहे. तसेच त्रिविक्रम मंदिराला असलेला ऐतिहासिक संदर्भ आणि पर्यटन विभागाने या ठिकाणी सुरू केलेले दुरुस्तीचे काम या ठिकाणाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवून पर्यटकांना तेर सारख्या ऐतिहासिक पर्यटन स्थळाकडे आकर्षित करण्यासाठी या हेरिटेज वॉकचा उपयोग होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या हेरिटेज वॉकसाठी तेर येथे २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता उपस्थित रहावे असे आवाहन पर्यटन जनजागृती संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

# २०४१ ची लोकसंख्या ग्राह्य धरून शहरासाठी तेरणा व रुईभर धरणातून पाणी आणण्यासाठी २३०.३२ कोटीस मान्यता – साळुंके

### मुख्यमंत्री शिंदे, पालकमंत्री प्रा डॉ सावंत, आ.राणा पाटील यांचे मानले आभार

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – धाराशिव शहराला लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक असलेले पाणी उचलले जात नाही. त्यामुळे ५ ते ६ दिवसाला पाणी पुरवठा केला जातो. त्यासाठी अमृत २ योजनेंतर्गत रुईभर व तेरणा धरणातून नव्याने सन २०४१ साठी योजना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तेरणा १६.८२, रुईभर ८.०५ व उजणी १८.०६ एमएलडी पाणी पुरवठा करण्यासाठी २३०.३२ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. त्यामुळे धाराशिव शहरास दररोज ५३.४६४ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी केंद्र शासन ३३.३३ टक्के, महाराष्ट्र शासन ५१.६७ व स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच नगर परिषदेचा १५ टक्के असा अनुक्रमे ७६.८७ कोटी, ११९ कोटी व ३४.५५ कोटी रुपये असा एकूण २३०.३२ कोटी रुपयांच्या निधीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांनी मान्यता दिली आहे. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा धाराशिव नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरज साळुंके यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्यास यश आले असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख तथा धाराशिव नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरज साळुंके यांनी दिली आहे. याबद्दल मुख्यमंत्री शिंदे, पालकमंत्री प्रा डॉ सावंत व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे साळुंके यांनी आभार मानले आहेत.
पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, धाराशिव शहरास तेरणा धरण, रुईभर धरण व उजनी (भिमानगर) धरण येथून पाणी पुरवठा केला जात आहे. तेरणा धरणातून सन १९७० साली ४.८० एमएलडी (MLD) क्षमतेची योजना करण्यात आली होती. तर रुईभर धरणातून सन १९८८ साली ५.८० एमएलडी (MLD) क्षमतेची योजना करण्यात आली होती. तसेच युआयडीएसएसएमटी (णखउ्ड्डचढ) योजनेंतर्गत उजनी धरणातून सन २०१३ साली ८ एमएलडी (चडऊ) क्षमतेची योजना करण्यात आली. त्यानंतर सन २०२० साली अमृत योजने अंतर्गत उजनी धरणावरील योजनेत वाढीव कामे करून १६ एमएलडी (MLD) क्षमता करण्यात आली. तर ही योजना राबवत असताना रुईभर व तेरणा धरणातील योजनेतून प्रत्येकी ५ एमएलडी (MLD) असे १० एमएलडी (MLD) क्षमता पाणी धाराशिव शहरास प्राप्त होईल असे गृहीत धरण्यात आले होते. परंतू रुईभर धरणातून येणारी पाईपलाईन एमएस (MS) ची होती. तर २०१२ व २०१८ च्या दुष्काळात बंद असल्यामुळे गंजून खराब झाली. सन २०१९ पासून ती योजना, पाईपलाईन व मोटारी खराब झाल्यामुळे बंद आहे. तसेच तेरणा धरणातून १९७० साली करण्यात आलेल्या योजनेची पाईपलाईन व मोटारीच्या वारंवार दुरुस्तीमुळे त्या योजनेतून २ एमएलडी (चडऊ) पाणी उचलले जात आहे. धाराशिव शहराची २०२४ ची लोकसंख्या अंदाजे १ लाख ४० हजार आहे. तर शहरास दररोज १८ एमएलडी (चडऊ) पाणी उपलब्ध होत असल्यामुळे ५ ते ६ दिवसाला धाराशिव शहरास पाणी पुरवठा होत आहे. त्यासाठी अमृत २ योजनेंतर्गत रुईभर व तेरणा धरणातून नव्याने सन २०४१ साठी योजना करण्याचे प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल धुळे येथील मानवसेवा कन्सल्टंट यांच्याकडून तयार करून घेण्यात आला व त्यास छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता यांच्याकडून पत्र क्र.जा.क्र. मुअमजीप्राछसं/तांश – ३ /२४८०/२०२४ दि.२९/७/२०२४ रोजी २४३,९८,५२६०० रुपयांच्या



अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे या योजनेस अमृत २ मधून प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून दिल्यास धाराशिव शहराची २०४१ पर्यंतच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागणार असल्याचे साळुंके यांनी सांगितले. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल साळुंखे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत व आमदार राणाजगजिसिंह पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

## कचरा डेपोमधील कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करण्याची मागणी



धाराशिव दि.२५ (प्रतिनिधी) – शहरातील कचरा डेपोतील कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करावी किंवा नागरिकांच्या आरोग्यासाठी हा कचरा डेपो इतरत्र हलविण्यात यावा अशी मागणी शिवसेना (ठाकरे) जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे दि.२६ सप्टेंबर रोजी केले आहे.
दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव शहरातील उचलण्यात येणारा कचरा हा शहरालगतच्या कचरा डेपोमध्ये टाकण्यात येतो. मात्र हा कचरा नेमका डेपो असलेल्या जागेवर टाकण्याऐवजी रस्त्या लगतच टाकण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरात कचरा अस्ताव्यस्त पडलेला असतो. त्याचा वास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. या कचऱ्यामध्ये जनावरांचे टाकाऊ मास देखील असते. त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन साथरोग पसरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या दुर्गंधीमुळे अनेकांना श्वसनाचे आजार झाले आहेत. तर डेंग्यू सदृश्य आजाराची लागण बालकांना होत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना जीव मुठीत घेऊन जीवन जगावे लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. कचऱ्यावर योग्य प्रक्रिया व कचऱ्याचे विलगीकरण केल्यास नागरिकांची दुर्गंधीपासून मुक्तता होऊ शकते. त्यामुळे कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावणे शक्य नसेल तर हा कचरा डेपो इतरत्र हलवून परिसरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखावे.
त्यासाठी संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे. येत्या १५ दिवसांत योग्य ती कार्यवाही करावी. अन्यथा युवासेना व शिवसेना (ठाकरे) च्यावतीने जिल्हा प्रशासन व नगर परिषद प्रशासनाच्या विरोधात आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. यावर शिवसेना (ठाकरे) चे धाराशिव शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवा सेना शहरप्रमुख रवी वाघमारे, माजी नगरसेवक गणेश खोचरे, कृष्णा वाघमारे, नरेश लेणेकर, प्रदीप तेरकर, संजय माने, मनोज जाधव, सौरभ काकडे, युवराज मडके, मनोज जमादार, अर्जुन पवार, सुनील परसे, प्रवीण तट, ओंकार भोरे, शरद पाटील, राजू चव्हाण, योगेश साळुंके, अविनाश इरकर, पी.डी. पाटील, दिलीप डोंबे, सचिन गुंडाळे, सचिन बेद्रे, राज निकम, सुरज लोंढे, प्रदीप साळुंके, दिलीप महाजन, अमोल जाधव, गजेंद्र शेरकर, सुहास शेरकर यांच्यासह गणेश नगर, इंगळे गल्ली, खाजा नगर भागातील नागरिकांच्या सह्या आहेत.

## राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थांनी सेवा करून स्वतः कौशल्य विकास साधावा – प्राचार्य ढोकळे




नळदुर्ग दि.२६ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय सेवा योजना स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही मूल्य व शिक्षण हे सर्व स्वयं सेवकांमध्ये रुजविण्यात यशस्वी झाली आहे. तर सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा तसेच राष्ट्र व समाजा प्रती जबाबदारीचे कार्य करणारा रासेयो हा अभिनव उपक्रम आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यामध्ये आपला सहभाग नोंदवावा. तसेच यावर्षी वेगवेगळ्या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची उदाहरणे देऊन येणाऱ्या काळात स्वयंसेवकाने प्रत्येक शिबिर व कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवून स्वतःचा कौशल्य विकास साधावा असे आवाहन प्राचार्य रामदास ढोकळे यांनी केले.
लोहारा येथील भानुदासराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला.
त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी.आर. घोलकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. अभिजीत सपाटे व अंतर्गत मूल्यांकन समन्वयक प्रा.डॉ.प्रशांत माने आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य ढोकळे म्हणाले की, येणाऱ्या काळात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी देखील रासेयोची सुविधा महाविद्यालयात उपलब्ध करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एम एस मोरे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र पात्रे व आभार प्रा. डॉ. एस टी सरवदे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरी धरणाच्या सांडव्याचे पत्रकारांच्या हस्ते जलपूजन



नळदुर्ग दि.२६ (प्रतिनिधी) – एक वर्षानंतर पुन्हा एकदा नळदुर्गसह परिसराला पाणी पुरवठा करणारे बोरी धरण १०० टक्के भरले असून त्याचा सांडवा ओसंडून वाहत आहे. त्यामुळे नळदुर्गकरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून हा सांडवा पाहण्यासाठी नळदुर्गसह परिसरातील नागरिक सांडवा पाहाण्या साठी गर्दी करीत आहेत. सांडवा पाहून त्यांचा आनंद द्विगुणित झाल्यामुळे त्यांचे डोळे दिपून गेले. हा सांडवा चालू होताच नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्यावतीने जल पूजन करण्यात आले.
बोरी धरणातील पाणी साठा कमी होऊन तो फक्त ६ टक्के असल्यामुळे नागरिक चिंतेत होते. परंतू नळदुर्गकरांवर परतीच्या पावसाने कृपा केल्यामुळे बोरी धरण तुडुंब भरले असून निसर्गाचे वरदान नळदुर्गकरांना मिळाले आहे. बोरिधरणाचा सांडवा ओसंडून वाहत असलेला दिसून येत असल्यामुळे नागरिक व पर्यटकात आनंदाचे वातावरण पसरले आहे. सांडवा चालू होताच नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्यावतीने जल पूजन करण्यात आले. यावेळी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे, पत्रकार तानाजी जाधव, लतीफ शेख, दादासाहेब बनसोडे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, अमर भाळे, पत्रकार भगवंत सुरवसे, शिवाजी नाईक अजित चव्हाण, संजय जाधव आदी उपस्थित होते.

## माजी सैनिकांच्या अडचणींच्या निराकरणासाठी आज मेळाव्याचे आयोजन

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) जिल्ह्यातील माजी सैनिक, वीर नारी, वीर पिता व सर्व वयोवृद्ध सैनिकांसाठी मराठवाडा विभागातील सर्व माजी सैनिक, वीर नारी, वीर पिता व सर्व वयोवृद्ध सैनीकांसाठी ९७ अर्टीलरी ब्रिगेड येथील सर्वत्रा ऑडीटोरीयम छावणी छत्रपती संभाजीनगर येथे दि.२७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजतापर्यंत मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळव्यामध्ये पेंशन व स्पर्शसंबधी असलेल्या शंका व अडचणीच्या निराकरण व्यतिरिक्त वन रँक वन पेंशन व अन्य शासकीय योजनांबाबत माहिती व मार्गदर्शन पुणे येथील रक्षा लेखा कार्यालय (अधिकारी) चे प्रधान नियंत्रक प्रतिनिधी करणार आहेत. त्यामुळे या मेळाव्यास सर्व सेवानिवृत्त सैनिक अधिकारी, माजी सैनिक, वीर नारी, वीर पिता व सर्व वयोवृद्ध सैनिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ९७ अटीलरी ब्रिगेड छ.संभाजीनगर व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी धाराशिव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०२४०–२३७०३१३ यावर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे धाराशिव जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# तुळजापूर तीर्थक्षेत्राचा १९९९ कोटींचा विकास आराखडा मान्यतेसाठी सादर – आ. पाटील


तुळजापूर दि.२६ (प्रतिनिधी) – तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या वैभवात भर टाकणारा व भाविक भक्त, पुजारी व शहरवासियांना विश्वासात घेत सोयी–सुविधा उपलब्ध करुन देणारा परिपुर्ण असा १९९९ कोटी रुपयांचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. पालकमंत्री व मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उचाधिकार समितीच्या मान्यतेसह या प्रस्तावास पुढील १० दिवसांत मंजुरी मिळणार असल्याचा विश्वास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.२६ सप्टेंबर रोजी व्यक्त केला.
तुळजापूर येथील सर्किट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, आई तुळजाभवानीचे तीर्थक्षेत्र विकसीत करण्यासाठी प्राथमिक विकास आराखडा तयार करण्यात आला होता. या विकास आराखड्यास १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपतीसंभाजी नगर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून आयडिया कॉम्पटिशन घेण्यात आली होती. निश्चित केलेल्या वास्तु विशारद कंपनीने आराखड्याचे सादरीकरण केल्यानंतर तो आराखडा मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नागरिकांच्या सूचना व हरकती मागवून घेण्यात आल्या. तर दि.२० जुलै रोजी मी शहरवासियांसोबत बैठक घेतली. आलेल्या सुचनांवर निर्णय घेण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच पुजारी, भाविक व शहरवासियांच्या सुचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सुचनांचा अंतर्भाव करण्यात आला व दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी अंतीम आराखडयाचे सादरीकरण केले. तसेच तो आराखडा जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविला असून पुढील १० दिवसांत या प्रस्तावास मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची मान्यता मिळेल, असा विश्वास आ पाटील यांनी व्यक्त करुन ते म्हणाले की, महाद्वाराजवळच दर्शन मंडळ निश्चित करण्यात आला असून प्रवेश मार्ग व बाहेर जाण्याचा मार्ग देखील महाद्वारातूनच ठेवण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. तर आई तुळजाभवानी छत्रपती शिवाजी



महाराजांना भवानी तलवार देतानाचे १०८ फुट उंचीच्या शिल्पाचे काम स्टेनलेस स्टील व ब्राँझमध्ये वास्तु विशारद राम सुतार यांच्याकडून करुन घेण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. या आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगीक सुविधा, घाटशीळ व हडको येथे भाविक सुविधा केंद्र, शहरात व शहराच्या प्रमुख रस्त्यावरील प्रवेशद्वारावर आकर्षक कमान, वृंदावन गार्डन सारखा बाग बगीचा, वृध्द व दिव्यांगासाठी लिफ्ट, ट्रॅव्हलेटर या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विकास कामांसाठी आवश्यक भुसंपादनासाठी देखील निधीची तरतूद ठेवण्यात आली असून साधारणत: भुसंपादन, कर व इतर बाबी वगळता प्रत्यक्षात ११०० कोटींची कामे यामध्ये प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले.

## अरेरावीची भाषा वापरुन धमकी देणाऱ्या सचिवांवर कारवाई करावी – निटुरे

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण निटुरे यांना सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे यांनी अरेरावीची भाषा वापरुन पोलीस कारवाई करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे त्यांची मानसिक स्थिती बिघडली असून त्यांच्या जिवनाचे बरेवाईट होऊ शकते. त्यामुळे वाघमारे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निटुरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीच्या माध्यमातून राज्यभर काम करत असताना अनेक लोकांचा संपर्क येत असतो. या अनुषंगाने काही मंत्रालय पातळीवरील कामांचा पाठपुरावा करण्यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष निटुरे हे मुंबई येथील मंत्रालयातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे यांना भेट घेण्यास गेले होते. त्यावेळी वाघमारे यांनी वरिष्ठ पदाला न शोभणारे वर्तन करीत निटुरे यांना अरेरावीची भाषा वापरत पोलीस कारवाई करण्याची धमकी दिली. यावेळी पोलीसांना पाचारण करीत त्यांना कारवाईची भिती घातली. तसेच मंत्रालयात त्यांना प्रवेश बंदी करण्याच्या पोलिसांना सूचना दिलेल्या आहेत. एका राजकीय पक्षाच्या अध्यक्षाला प्रवेशबंदी करण्याचे कायद्याने त्यांना अधिकार दिलेले आहेत काय ? मंत्रालयात जनतेच्या कामाचे प्रश्न घेवून यायचे की नाही ? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वी आपणाकडून, कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या आश्रमशाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता व अनुदान प्रस्तावास मान्यता देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी स्वतः वाघमारे, यांना फोन करून सांगितले असताना, अपेक्षित कार्यवाही केली नाही. आपल्या आदेशाला देखील केराची टोपली दाखवत आहेत. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या नावे बाहेरील बोगस एजंटांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून बोगस शासन निर्णय काढण्यात येत आहेत. परंतू याबाबत हे तत्पर राहून कोणतीही कार्यवाही करत नाहीत. अशा परिस्थिती निटुरे यांची फाईल प्रलंबीत ठेवली आहे. विशेष म्हणजे पैशाशिवाय पुढे पाठविणार नाही का ? अशी शंका निर्माण झाली आहे. याबाबत पाठपुरावा करण्यासाठी भेटीची विनंती केली असता निटुरे यांना पोलीस कारवाई करण्याची धमकी दिली. त्यामुळे त्यांच्याकडे आता आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरला नाही. कारण निटुरे हे मागील काही दिवसांपासून आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्यामुळे तणावामध्ये जीवन जगत आहेत. त्यामुळे त्यांची शुगर व बीपी कमी जास्त होत असते. त्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा वागणुकीमुळे त्यांना काही बरवाईट झाले तर त्यास प्रधान सचिव व संबंधित अधिकारी जबाबदार राहतील. तसेच सामाजिक न्याय विभागामध्ये असा असामाजिक न्याय मिळत असेल आणि तोही विभागाच्या प्रमुखाकडून असे धमकाविण्याचे वर्तन होत असेल तर फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणायचे का ? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. असे संस्कारक्षम आयएएस अधिकारी पदाला शोभणारे नाहीत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी आणि आश्रमशाळा कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता व अनुदान प्रस्तावास मान्यता देण्याचा आदेश देण्यात यावा, अशी मागणी निटुरे यांनी केली आहे.

# संपादकीय

## घटनाही अमान्य...?

राज्यपालपदी राहून रवी बिनदिक्कतपणे घटनाविरोधी वक्तव्ये व कृती करतात, त्यांना यासाठी बळ कसे मिळते? भाजप व संघ यांच्या विचारांचा प्रचार करण्यास त्यांना नेमले आहे का? अशी शंका येते.

तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी यांना वादग्रस्त विधाने करण्याची सवय आहे. अनेकदा त्यांची कृतीही वादग्रस्त ठरते. धर्मनिरपेक्षता (सेक्युलॅरिझम) ही युरोपीय संकल्पना आहे, ती भारतीय नाही त्यामुळे तिला भारतात स्थान नाही' असे ते नुकतेच म्हणाले. त्यांच्या मते ही परदेशी संकल्पना असल्याने तिचा समावेश घटनेत करण्यात आला नव्हता. मात्र स्वत:ला असुरक्षित समजणाऱ्या पंतप्रधानांनी आणिबाणीत तिचा समावेश घटनेत केला' असेही ते म्हणाले. हे त्यांचे विधान आरोप' म्हणावे असे आहे. त्यांचा रोख श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर होता हे उघड आहे. त्यांच्या विधानावरून काहूर माजणे स्वाभाविक आहे. काँग्रेस, तामिळनाडूतील सत्तारूढ पक्ष द्रविड मुन्नेत्र कळघम व डाव्या पक्षांनी रवी यांच्यावर या विधानांबद्दल टीका केली, मात्र केंद्र सरकार व भारतीय जनता पक्ष याबाबत मौन बाळगून आहेत हे लक्षणीय आहे. रवी यांना नेमके काय म्हणायचे आहे? ते राज्यपाल आहेत. हे पद घटनात्मक' आहे. त्यामुळे तेही घटनेस बांधील आहेत, याची त्यांना जाणीव असावी अशी अपेक्षा आहे. ते कोणत्या पक्षाचा किंवा संघटनेचा विचार पुढे रेटत आहेत का? हा प्रश्न येथे महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यानंतर घटना समितीच्या बैठकीत धर्मनिरपेक्षता हा मुद्दा फेटाळला गेला असाही दावा त्यांनी केला आहे.

धार्मिक राष्ट्र हवे?

रवी अशी विधाने किंवा कृती वाद निर्माण व्हावा या हेतूने करत असावेत, अशी शंका घेण्यास जागा आहे. तमिळनाडूच्या सरकारमधील एका मंत्र्यास त्यांनी परस्पर बडतर्फ केले होते. राज्य सरकारने संमत केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी न करता ती अडवून ठेवल्याने सरकार व रवी यांच्यात वारंवार संघर्ष उडाला. त्यांनी बडतर्फ केलेल्या मंत्र्याचा पुन्हा मंत्रीमंडळात समावेश करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने देऊनही, रवी यांनी त्याची अंमलबजावणी टाळली होती. देशाच्या सर्वोच्च न्यायालयास ते झुगारत' आहेत, असे सर्वोच्च न्यायालयाने गेल्या मार्चमध्येच म्हटले होते. राज्य विधानसभेने संमत केलेली दहा विधेयके रवी यांनी अडवून ठेवली. त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी त्यांची कानउघाडणी केली होती. तरीही त्यांनी ती विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली होती. या बद्दलही सर्वोच्च न्यायालयाला पुन्हा हस्तक्षेप करावा लागला होता. एका सरकारी कार्यक्रमासाठी राज्यसरकारने निमंत्रणपत्रिका तयार केल्यानंतरही रवी यांनी स्वतंत्र निमंत्रण पत्रिका बनवून घेतल्या. त्यात संतकवी तिरुवल्लुवर यांना भगव्या वेषात दाखवण्यात आले होते. त्यावरूनही मोठा गदारोळ माजला होता. कन्याकुमारी जिल्ह्यातील एका गावात हिंदू धर्म विद्यापीठम या संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना रवी यांनी ताजे वादग्रस्त विधान केले. राज्यपाल पदावरील व्यक्तीस विविध संस्थांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहावे लागत असते. तेव्हा त्यांनी या कार्यक्रमास जाणे गैर म्हणता येणार नाही; पण तेथे असे वादग्रस्त विधान करण्यामागचा त्यांचा हेतू समजू शकत नाही. भारत हा धर्मकेंद्रित देश असल्याने घटना समितीने धर्मनिरपेक्षतेची कल्पना फेटाळली होती, हे त्यांचे विधान धाडसी व जास्त वादग्रस्त आहे.

आतापर्यंत घटनेच्या एकाही अभ्यासकाने या बाबीचा उल्लेख कसा केला नाही? घटनेनेसमता' व समानता' ही तत्वे स्वीकारली आहेत, त्यातच धर्मनिरपेक्षता' अथवा राज्यकारभार धर्मापासून वेगळा ठेवण्याचे तत्व अनुस्यूत किंवा समाविष्ट आहे. घटनेच्या प्रस्तावनेत १९७५ मध्ये समाजवादी' व धर्मनिरपेक्ष' हे शब्द समाविष्ट केले. ते पूर्वीचा जनसंघ व आताचा भाजप आणि त्यांची मातृसंस्था रा.स्व.संघ यांना मान्य नाही. लोकशाही',संघराज्य' या संकल्पना स्वतंत्र भारताच्या घटनेने विचारपूर्वक स्वीकारल्या. त्याही परदेशातून' आल्या, असे म्हणून त्या नाकाराव्यात असे रवी यांना म्हणायचे आहे का? म्हणजे देशाने पुन्हा एकदा राजे, संरजामशाही यांच्या काळात जावे, असे त्यांना सूचित करायचे आहे का? रवी यांची ताजी विधाने बघता त्यांना घटनाच अमान्य आहे असे वाटत आहे. देशाच्या ऐक्यासाठी हा दृष्टीकोन घातक आहे.

# आपल्या शिक्षणातून माणूस घडायला हवा

समाजात सध्या ज्या पद्धतीने संघर्ष उभे राहत आहेत. त्यात अगदी छोट्या छोट्या कारणांनी संघर्ष घडत आहेत. समाज माध्यमात कोणी तरी काही लिहिले, कोणी अगदी संवादात जरी कोणी काही म्हणाले, तरी समाजात मोठ्या प्रमाणावर भेद, द्वेष, मत्सराच्या भिंती उभ्या राहत आहेत. त्यामुळे दोन समूहात, दोन गटात, दोन धर्मातील नागरिकांमध्ये हाणामाऱ्या, दंगली होत आहेत, माणसे मारली जात आहेत. माणसांचे मरण अधिक स्वस्त होत आहे. हे सारे घडत असताना आपण कशासाठी हे करत आहोत? याचा विचारही केला जात नाही. आपल्या कृती करण्यामध्ये विवेक, शहाणपण किती याचाही विचार करणे घडत नाही. माणसे विवेक गमावून बसली आहेत असे आपल्या वर्तमानाचे चित्र आहे.

जेव्हा समाज अशिक्षित असतो तेव्हा निश्चितपणे अविवेकाने वागला तर वाईट घटना घडत जाणार यात शंका नाही. समाज शिक्षित झाल्यानंतर तो विचाराने अधिक समृद्ध होईल. विवेक आणि शहाणपणाची वाट चालणे घडेल असे मानले जात होते. शिक्षणाचा विचार मस्तकी आला की, माणसा-माणसातील द्वेष, मत्सर संपुष्टात येईल. जातीच्या भिंती संपुष्टात येतील. धर्म, पंथाचा खरा विचार स्वीकारला जाईल आणि माणूस म्हणून माणसे उभी राहतील अशी अपेक्षा होती. समाजातील संघर्ष नष्ट करण्याचा शिक्षण हाच एकमेव मार्ग असल्याचे जगात सांगितले जात असताना आज शिक्षित माणसेच अधिक संघर्षाच्या दिशेने पावले टाकत आहे. दुर्दैवाने शिक्षित माणसे अधिक धर्मांध बनत आहेत. सामान्य अशिक्षित माणसे किमान माणूसपणाची वाट चालत तरी होते; मात्र आज त्या वाटा अधिक दुरापास्त होत चालल्या आहेत. याचे कारण शिक्षणात शिक्षित माणसांच्या मस्तकात केवळ माहिती कोंबली जाते. शिक्षणातील शहाणपण, विवेक, ज्ञान, विचाराच्या वाटा हरवत चालल्या आहेत. त्यामुळे वर्तमानात शिक्षणातून विचार करायला शिकवणे आणि चिकित्सक दृष्टीकोन निर्माण करण्याचे आव्हान पेलण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षण म्हणजे केवळ अक्षरांची साक्षरता नाही, तर माणूस घडवणे आहे. माणूस घडवण्यासाठी शिक्षणाची वाट आज चाललो नाही, तर उद्याचे आपले भविष्य अंधाराच्या दिशेचा प्रवास ठरेल. त्यामुळे आजच गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

समस्यांचा परिणाम

आपण सजीव सृष्टीतील एक घटक आहोत. इतर प्राण्यांप्रमाणेच मानव हा देखील एक प्राणी आहे; मात्र त्या सजीवसृष्टीत माणूस हा अत्यंत बुध्दिवान प्राणी आहे असे मानले गेले आहे. बुध्दिवान प्राणी आहे याचा अर्थ तो विचारशील प्राणी आहे. माणूस हा आपल्या अवतीभोवती घडत जाणाऱ्या घटनांचा विचार करत असतो. त्या घटनांच्या माध्यमातून समस्या निर्माण होणार असतील, तर त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न केले जातात. स्वतःच्या जीवनाबरोबर समाजाचे जीवन देखील अधिक समृद्ध होईल त्यादृष्टीने प्रयत्न केले जात असतात; मात्र आज आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या अनेक घटनांमुळे जीवनात समस्या निर्माण होत आहेत. त्याचा विकासावर परिणाम होणार असेल, तर त्याबद्दल गंभीरतेने विचार करून मात करण्याचा प्रयत्न करण्याची गरज असते. निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नांची गरज दिवसेंदिवस अधोरेखित होत आहे. हे निराकरण करणे अथवा समस्येवर मात करण्यासाठी माणसाने विचार करायचा असतो. विचार करताना माणूस जे विविध स्वरूपाचे अनुभव घेत असतो त्या अनुभवाचे विश्लेषण, परीक्षण करत



नवज्ञानाची निर्मिती करत असतो. त्यातून निर्माण होणाऱ्या ज्ञानाच्या आधारे मात करण्याचा विचार केला जात असतो. मुळात जेव्हा जेव्हा संकट येतात तेव्हा निसर्गातील इतर प्राणी एकवेळ पलायन करतील; पण माणूस मात्र पलायन करत नाही. त्यापासून दूर जाणे त्याला माहित नसते. संकट आहे म्हणून घाबरून जाण्याचा विचार न करता तो त्यावर मात करण्याचा विचार करत असतो. अर्थात जोवर व्यक्तीकडे अनुभव समृद्ध आहेत आणि त्यातून ज्ञानाची प्रक्रिया घडण्याची शक्यता असते. ती प्रक्रिया घडली तरच समस्यांवर मात करणे शक्य आहे. एखादी घटना का घडली? हे जाणून घेण्यासाठी त्याच्या कारणांच्या मुळाशी जाण्याचा विचार केला जात असतो. हे मुळाशी जाणे तो विचारच माणसांच्या वेगळ्या प्रवासाची साक्ष आहे.

मुळात आपल्याकडे शिक्षणाची प्रक्रिया पुढे जाते आहे; मात्र शिक्षणातून जीवन समृद्ध होण्याची शक्यता आता दिसत नाही. शिक्षण आणि जीवन यांचे नाते तुटल्याने त्या प्रक्रियेत जगण्यासाठीचा विचार किती? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे. वर्तमानातील शिक्षण प्रक्रियेत आपण माहिती, विचार पेरण्याचे काम करत आहोत; पण एखाद्या गोष्टीचा विचार कसा करायचा? हे शिकवले जात नाही. विचार का करायचा? आपले शिक्षण प्रक्रियेत जीवन समृद्धतेसाठी अनुभव, प्रात्यक्षिकावर भर नाही, तर केवळ माहिती देणे आणि प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेणे एवढ्यापुरता तो विचार आहे. शिक्षण मुळात जीवनापासून तुटत चालले आहे. त्यामुळे माणसे शिकल्यानंतर देखील ते अधिक अंधश्रद्धा बनताना दिसत आहेत. शिकलेल्या माणसांमध्ये श्रद्धा असायला हरकत नाही; पण ते अधिक अंधश्रध्दा असतील तर ती त्याची चूक आहे असे नाही, तर शिक्षणातील चिकित्सक विचार, दृष्टीकोन पेरण्यात आपण अपयशी ठरलो आहोत.

उत्तरांचा शोध

वर्तमानातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेता आपल्याला विद्यार्थ्यांमध्ये विविध गुणांची रूजवण करण्याची गरज अधोरेखित होते आहे. मुळात शिक्षण प्रक्रियेत देखील एखाद्या विषयाची विशिष्ट माहिती स्वीकारण्यापूर्वी अनेक छोट्या प्रश्नांच्या साहाय्याने त्या विषयाची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची प्रक्रिया रूजवण्याचे आव्हान वर्तमानात आहे. सत्यापर्यंत पोहचणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. त्यासाठीची प्रक्रिया शिक्षणातून रूजवण्याची गरज आहे. आज कोणतीही माहिती आली, की त्यावर विश्वास ठेवला जातो. ते खरेच आहे असे मानले जाते. मुळात आपल्याला दिली जाणारी माहिती, समाज माध्यमात येणारी माहिती, अथवा शाळा-महाविद्यालयात शिकवत असताना दिली जाणारी माहिती याबद्दल किती विश्वास ठेवायचा याचा विचार करायला शिकवण्याची गरज आहे. मुळात संशय निर्माण होणे हाच ज्ञानाचा आरंभ मानला जातो. कोणी तरी सांगते आहे म्हणून आपण जर विश्वास ठेऊ लागलो तर आहे ते स्वीकारणे होईल. त्यातून माणसे अनुकरण प्रिय बनण्याचा धोका असतो. तसे घडले तर ज्ञानाची निर्मिती होण्याची शक्यता नाही. त्यामुळे मुळात आपल्याला ज्ञानापर्यंत पोहोचायचे असेल तर छोटे-छोटे प्रश्न निर्माण करून सत्य, ज्ञानापर्यंत पोहचण्याची प्रक्रिया घडायला हवी. प्रश्न पडणे आणि त्या प्रश्नांच्या मागे-मागे उत्तराच्या शोधासाठी प्रवास करणे हाच शिक्षणाचा मार्ग आहे. ती प्रक्रिया शिक्षणातून घडण्यासाठीच्या प्रक्रियेची पाऊलवाट निर्माण करण्याची गरज आहे. तसे घडले तरच शिक्षणाचे अपेक्षित हेतु साध्य होण्याची शक्यता आहे.

मुळात चिकित्सक विचार हा शिस्तबद्ध स्व-निर्देशित विचार आहे. जो विशिष्ट पद्धतीने किंवा विचारांच्या क्षेत्रासाठी योग्य विचार करण्याच्या परिपूर्णतेचे दिशेचा हा प्रवास आहे. एखाद्या विषयाची माहिती स्वीकारण्यापूर्वी अनेक लहान सहान प्रश्नांच्या साहाय्याने त्या विषयाचे बारकावे पडताळून पाहणे गरजेचे असते. अशी पडताळणी करणे म्हणजेच चिकित्सक विचार कौशल्य आहे; मात्र आज आपल्याला असे प्रश्न पडण्याची व्यवस्था निर्माण करण्यात यश मिळू शकले नाही. मुळात मुलांच्या मनात प्रश्न निर्माण होणे हेच खरे अध्यापन मानले जाते. आज दुर्दैवाने प्रश्न पडले तरी त्या उत्तराच्या शोधासाठी प्रवास न करता बाजारात तयार उत्तरांच्या गाईडांचा शोध घेत उत्तरे शोधली जातात. त्यामुळे विचार करण्याची गरजच पडत नाही. शिक्षणात तयार उत्तरांच्या शोधाने मार्क मिळतील; पण उत्तम नागरिक घडले जाण्याची शक्यता अजिबात नाही, हे लक्षात घेण्याची गरज आहे. विचाराची प्रक्रियाच घडणार नसेल, तर आपल्याला उत्तम नागरिकत्वाची वाट सापडण्याची शक्यता नाही. मुळात आपल्याकडे मुलांना प्रश्न पडत नाही असे नाही; मात्र पडणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधासाठी प्रोत्साहनाची व्यवस्था नाही. अनेकदा मुले आपल्या अवतीभोवती वागत असताना त्यांना कितीतरी प्रश्न पडत असतात. अनेकदा विमानाचा आकार असाच का? सूर्य पूर्वेला का उगवतो? आकाश निळे लाल का दिसते? एकाच जमिनीत झाड लावले तर त्याला येणाऱ्या फळांची चव भिन्न का असते? भाज्याचा रंग हिरवा का असतो? एकाच जमिनीत उगवून सुद्धा पाने, फुले आणि फळांचा रंग भिन्न का? असे अनेक प्रश्न छोट्या छोट्या प्रश्नांच्या उत्तरासाठी मुले प्रयत्न करतात. ते घरी, बाहेरील व्यवस्थेतील नागरिकांना प्रश्न विचारत असतात; मात्र अनेकदा तिथे उत्तरे मिळण्याची शक्यता नसते. मुळात प्रश्न पडणे हेच आपल्या शिक्षणाचे यश आहे. त्यातून लोकशाही व्यवस्था अधिक भक्कम होत असते; मात्र प्रश्न विचारणे म्हणजे आगाऊपणा करणे वाटत जाते. अनेकदा तुला काय करायचे आहे? हे प्रश्न परीक्षेला येणार नाही. परीक्षेसाठी अभ्यास कर. मुळात प्रश्न पडणाऱ्या व्यवस्थेचे आपल्याकडे स्वागत होत नाही. त्यामुळे ज्ञानापर्यंत प्रवास करायचा असेल, तर मूळ प्रश्नांच्या उत्तरासाठी छोटे-छोटे प्रश्नांच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रवास घडवायला हवा.


एखाद्या विषयाची विशिष्ट माहिती स्वीकारण्यापूर्वी अनेक छोट्या प्रश्नांच्या साहाय्याने त्या विषयाची सत्यासत्यता पडताळून पाहाण्याची प्रक्रिया रूजवण्याचे आव्हान वर्तमानात आहे. चिकित्सक विचार हा शिस्तबद्ध स्व-निर्देशित विचार आहे. जो विशिष्ट पद्धतीने किंवा विचारांच्या क्षेत्रासाठी योग्य विचार करण्याच्या परिपूर्णतेचे उदाहरण दिले जाते. एखाद्या विषयाची विशिष्ट माहिती स्वीकारण्यापूर्वी अनेक लहान सहान प्रश्नांच्या साहाय्याने त्या विषयाचे बारकावे पडताळून पाहणे गरजेचे असते. अशी पडताळणी करणे म्हणजेच चिकित्सक विचार कौशल्य होय. ते रूजवल्याशिवाय उत्तम नागरिक निर्मितीची शक्यता नाही.

चिकित्सक विचार

एकूणच जेव्हा विवेकी वर्तनाच्या प्रवाहापासून दूर जाणे घडत जाते तेव्हा त्याच्या मुळाशी जी अनेक कारणे आहेत त्यामागे महत्त्वाचे एक कारण आहे; चिकित्सक विचार प्रक्रियेचा अभाव. त्यामुळे समाजात आपल्याला समता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल, तर आपल्याला वर्तमानातील शिक्षण प्रक्रियेचा पुनर्विचार करण्याची अधिक गरज आहे. विवेक, शहाणपणाचा विचार प्रतिबिंबीत करायचा असेल, तर शिक्षणातून चिकित्सक विचार रूजवण्याची गरज पुन्हा पुन्हा अधोरेखित होऊ लागली आहे. याचा अर्थ माणसाला चौफेर विचार करता येणे, प्रत्येक घटना, प्रसंग, परिस्थिती यांच्या मुळाशी जात जाणून घेत वस्तुनिष्ठ विश्लेषण करत परीक्षण करण्याचा विचार म्हणजे चिकित्सक विचार. आज ही पाऊलवाट शिक्षणात दिसत नाही. तसे असते तर सध्या समाजमाध्यमातून जे काही प्रतिबिंबीत होताना दिसते आहे ते आपल्याला पाहावे लागले नसते. कोणी एखाद्या व्यक्तीने केलेली पोस्ट वाचली तरी माणसे उसळतात. ती पोस्ट करणारा कोण आहे? त्याला त्या विषयाची समज किती आहे? त्याने मांडलेला विचार म्हणजे तो काही त्या विषयाचा तज्ज्ञ नाही, हेही लक्षात घेण्याची गरज आहे. त्याचा हेतु काय? त्याचबरोबर त्यासाठीची एक व्यवस्था आहे; पण त्या मार्गाने न जाता आपणच आपली वाट निर्माण करत आहोत. आपल्याला कायदा हातात घेऊन चालणे पसंत पडत असेल, तर आपले शिक्षण झाले नाही असेच म्हणावे लागेल. चिकित्सक विचार करण्याची वृत्ती निर्माण झाली तर विवेक आणि शहाणपणाची वाट चालणे घडण्याची शक्यता अधिक असते. त्यातून आपल्याला अपेक्षित समाज निर्माण करणे शक्य आहे. त्यातून समाजातील संघर्ष कमी होण्यास मदत होईल.

**-ऐसपैस शिक्षण : संदीप वाकचौरे**

# उपदेशकथा: व्यसन



एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झालेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे.

कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, विडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटे विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.

**कथा उपदेश :** बिडी-सिगरेटचं व्यसन फार घातक आहे. ते लावून घेऊ नये.

# राशी भविष्य



२७ सप्टेंबर २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग :हिरवा,शुभ दिशा:उत्तर
पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या. आजचा दिवस व्यस्त जाईल.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व
आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील.

मिथुन : शुभ रंग: निळा,शुभ दिशा: उत्तर
आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका. व्यापार व्यवसाय सामान्य राहील. अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे.

कर्क : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे. कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

सिंह : शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: पूर्व
मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठा व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. त्यामुळे भविष्यात फायदा होईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

कन्या : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : उत्तर
आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका.

तुळ : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील. मुलांकडून सहकार्य मिळेल.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

धनु: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल. अनावश्यक कामे टाळा.

मकर: शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पूर्व
प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल. व्यावसायात गोपनियता ठेवा.

कुंभ : शुभ रंग :लाल, शुभ दिशा :उत्तर
आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मीन : शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पूर्व
नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू नका.

२७ सप्टेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, नेपच्यून, मंगळ व शुक्राचा प्रभाव आहे. स्वभावाने तुम्ही हळवे आहात. इतरांच्या सुखदु:खांशी तुम्ही चटकन समरस होता. तुमची वृत्ती आक्रमक असली तरी कुणाला दुखवण्याचा तुमचा हेतू नसतो. निर्णय घेतांना साधकबाधक गोष्टींचा विचार करण्यापेक्षा तो अंत:स्फूर्तीने घेणे तुम्ही अधिक पसंत करता. सत्ता व अधिकारपद मिळवण्याची तुमची महत्वाकांक्षा असते. तुमचा आत्मविश्वास अडचणींमुळे कमी होत नाही. तंत्राज्ञान, मैदानी व मर्दानी खेळात तुम्ही प्रवीण असता. भावनेच्या भरात निर्णय घेण्याचे टाळा. विवेक वापरा, सगळी कामे एकट्याच्या हिमतीवर करण्याचा आग्रह सोडून द्या. कुणी सहकार्य दिल्यास ते नाकारू नका. संताप, त्रागा यामुळे अल्सर, रक्तदाबासारखे विकार होतील. भावनांवर नियंत्रण हवे. ध्यान इ. चा फायदा होईल.

कार्यक्षेत्र : तंत्रमंत्रावर प्रभुत्व असल्याने इंधने, ऊर्जा, वीज, ऑटोमोबाईल वगैरे शाखेतील पदवी हस्तगत करण्याचा प्रयत्न करा. म्हणजे नंतर स्वतंत्र व्यवसायही करता येऊ शकेल. पोलिस, गुप्तचर खाते, संरक्षण दल, नाविक दल या ठिकाणी तुमच्या धाडसी प्रवृत्तीला अधिक वाव मिळेल. वैद्यकिय क्षेत्रात त्वचारोग, रक्तभिसरण संस्था, हृदयविकार, प्लॉस्टिक शल्यक्रिया यात यश मिळवू शकाल.

प्रणयी जीवन : जोडीदार निवडतांना देखणेपणा, बांधेसूद शरीरयष्टी याला तुम्ही जास्त महत्व देता. तुमच्या धाडसी प्रवृत्तीचे कौतुक करावे अशी तुमची जिवलगाकडून अपेक्षा असते. तुमच्यावर वर्चस्व गाजवणाऱ्या व्यक्ती तुम्हाला आवडत नाहीत. मार्च २१ ते एप्रिल २० दरम्यानच्या व्यक्ती टाळा. एप्रिल २१ ते मे २० दरम्यानच्या व्यक्ती निवडा.

वर्षफळ : व्यवसायानिमित्त बाहेरगावी प्रवास दौरे करण्याची तयारी ठेवा. पोलाद, खनिजे यात गुंतवणूक करा. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये कुणातरी व्यक्तीबल प्रेमभावना अंकुरेल. डिसेंबर जानेवारी मध्ये काही धोरणांचा पुनर्विचार करावा लागेल. फेब्रुवारी मार्च मध्ये प्रचारमोहिमातील यशाबल गौरव होईल. एप्रिल मे मध्ये राजकारणात वर्चस्व सिध्द करू शकाल. जुलै ऑगस्ट मध्ये मुलांच्या चमकदार यशाने धन्यता वाटेल.

महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२.

भाग्यरत्न : पोवळे

याच तारेखेची व्यक्ती : भगत सिंग, यश चोप्रा

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १२५/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार श्रीनिवास पि. बाळेदेव जोशी, रा. वलांडी ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराची चुलती नामे पुष्पावती त्र्यंबक जोशी हे दिनांक ०९/०३/२०२४ रोजी मौजे वलांडी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | श्रीनिवास बाळुदेव जोशी | ८० | पुतण्या |

अर्जदार श्रीनिवास पि. बाळेदेव जोशी, रा. वलांडी ता.देवणी जि.लातूर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १३/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २१/१०/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

---

## तहसीलदार, तथा तालुका दंडाधिकारी उदगीर यांचे कार्यालय
## (भुसूधार विभाग )

जा.क्र.२०२४/भुसूधार/कावी- दि. २६.०९.२०२४

जाहीरप्रगटन

ज्याअर्थी अर्जदार श्री ग्यानोबा भिवाजी भदाडे रा. शिरोळ (जा) ता.उदगीर यांनी दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मौ. शिरोळ (जा) येथील गट. नं. १५१ मधील जुना स.नं. २४ क्षेत्र ९ हे. ०९ आर. वर ईतर हक्कात श्री. भाउराव मारोती यांचे सरंक्षीत कुळ अशी नोंद असून आज पर्यत मागील ६० वर्षे पासून ताबा नसुन त्या जमिनीवर अर्जदार त्यांचे भाउ यांचा ताबा असल्याचे पंचानी सांगीतले असे मंडळ अधिकारी नागलगाव यांनी अहवालात नमूद केले आहे. तरी मौ. शिरोळ (जा) येथील जमीन ग.नं. १५१ मधील ईतर हक्कात नाव कमी करणे बाबत अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार श्री. ग्यानोबा भिवाजी भदाडे रा. शिरोळ (जा) ता.उदगीर येथील गट.नं. १५१ मधील सरंक्षीत कुळ बाबत कोणास आ-क्षेप असेल तर या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत या कार्यालयात आपले म्हणने दाखल करावे अन्यथा आपले आक्षेप काही नाही असे ग्रहित धरुन ग.नं. १५१ मधील सरंक्षीत कुळ नाही म्हणून जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तहसीलदार उदगीर

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२३/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार अन्सार बाबुमियाँ तांबोळी वय ४३ वर्ष रा. जळकोट ता. जळकोट जि. लातुर यांच्या भाचाच्या नामे मुसददीक लायक चौधरी यांचा जन्म मौजे जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक १८/०१/२००७ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील मुसददीक लायक चौधरी यांचा जन्म दिनांक १८/०१/२००७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मुसदीक लायक चौधरी यांचा जन्म दिनांक १८/०१/२००७ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु मुसददीक लायक चौधरी यांचा जन्म दिनांक-१८/०१/२००७ रोजीची नोंद नगरपंचायत कार्यालय जळकोट ता.जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २४/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१९/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार कृतांजली तुळशीदास कांबळे वय २६ वर्ष रा. करंजी ता.जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे करंजी ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०९/१२/१९९८ रोजी असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील कृतांजली तुळशीदास कांबळे यांची जन्म दिनांक ०९/१२/१९९८ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कृतांजली तुळशीदास कांबळे यांचा जन्म दिनांक ०९/१२/१९९८ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु कृतांजली तुळशीदास कांबळे यांचा जन्म दिनांक-०९/१२/१९९८ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय करंजी ता.जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १९/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २०/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १३३/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार गणेश पि. केशव खुळे रा. बोरोळ ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे वडील नामे केशवराव नरसिंगराव खुळे हे दिनांक ०२/०६/२०२२ रोजी मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | छानबाई भ्र. केशवराव खुळे | ७७ | पत्नी |
| २) | गणेश पि. केशवराव खुळे | ३९ | मुलगा |
| ३) | चंद्रकला भ्र. बाबुराव बिरादार | ५८ | मुलगी |
| ४) | सुमित्रा भ्र. गोविंदराव तरवडे | ५३ | मुलगी |
| ५) | वर्षा भ्र. विलास पाटील | ४९ | मुलगी |
| ६) | रंजना भ्र. रावसाहेब जाधव | ४७ | मुलगी |
| ७) | सविता भ्र. शिवाजीराव पाटील | ४१ | मुलगी |

अर्जदार गणेश पि. केशवराव खुळे रा. बोरोळ, ता.देवणी जि.लातूर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरु-पात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २६/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ११/११/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२३/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार अन्सार बाबुमियाँ तांबोळी वय ४३ वर्ष रा. जळकोट ता. जळकोट जि. लातुर यांच्या भाचाच्या नामे सौमान लायक चौधरी यांचा जन्म मौजे जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक २७/०५/२००९ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील सौमान लायक चौधरी यांचा जन्म दिनांक २७/०५/२००९ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सौमान लायक चौधरी यांचा जन्म दिनांक २७/०५/२००९ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु सौमान लायक चौधरी यांचा जन्म दिनांक-२७/०५/२००९ रोजीची नोंद नगरपंचायत कार्यालय जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २४/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२५/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार कलमे स्नेहा विवेक वय २१ वर्ष रा. परभणी ता.परभणी जि. परभणी यांचा जन्म मौजे जळकोट ता . जळकोट जि . लातूर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक २७/०८/२००४ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद करण्यात आलेली नाही. सदरील कलमे स्नेहा विवेक जन्म २७/०८/२००४ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कलमे स्नेहा विवेक यांचा जन्म दिनांक २७/०८/२००४ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु कलमे स्नेहा विवेक यांचा जन्म दिनांक-२७/०८/२००४ रोजीची नोंद नगरपंचायत कार्यालय, जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २६/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७२८/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Gundaji Ramrao Waghmare हे दिनांक ०२.०८.२०२४ रोजी Medical College and Hospital Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Jankabai Gundaji Waghmare Age 75 yrs, Occu. Nil,
Applicant R/o. S.T.Colony, Udgir Tq. Udgir, Dist.latur

यांनी खालील नमुद एकमेव व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Jankabai Gundaji Waghmare | 75 | Wife |

अर्जदार याने Gundaji Ramrao Waghmare या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Gundaji Ramrao Waghmare याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायलयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १६/१०/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२३/०८/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार श्री गुलाब पिरसाब शेख रा. हावरगा ता. जळकोट यांचे वडील नामे पिरसाब हसनसाब शेख यांचा मृत्यु दिनांक २७/०८/२०२३ रोजी मौजे हावरगा ता. जळकोट येथे झाला असुन मृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्यु नोंद करण्यात आलेली नाही. अर्जदार श्री गुलाब पिरसाब शेख रा.हावरगा ता. जळकोट यांचे वडील नामे पिरसाब हसनसाब शेख यांचा मृत्यु दिनांक २७/०८/२०२३ रोजीची नोंद मृत्युनोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २०/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांच्या वडीलांचा मृत्यु दिनांक २७/०८/२०२३ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणणे दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार श्री गुलाब पिरसाब शेख रा. हावरगा ता. जळकोट यांचे वडील नामे पिरसाब हसनसाब शेख यांचा मृत्यु दिनांक २७/०८/२०२३ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, हावरगा ता. जळकोट येथे करण्यात येईल.

आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १२८/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नामे सुभाष पि. रामजी गरड रा. बोरोळ ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे अनुक्रमे वडील व भाउ नामे रामजी उर्फ रामा माधव उर्फ महादु गरड व विनायक रामजी गरड हे अनुक्रमे दिनांक ०२/१०/२०१२ व ०६/०८/२०२७ रोजी मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झालेले असुन ते मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | कमळाबाई. रामजी गरड | ७२ | पत्नी |
| २) | शेषेराव पि. रामजी गरड | ६० | मुलगा |
| ३) | विलास पि. रामजी गरड | ५३ | मुलगा |
| ४) | सुभाष पि. रामजी गरड | ५१ | मुलगा |
| ५) | सुरेश पि. रामजी गरड | ४६ | मुलगा |
| ६) | प्रभावती भ्र.शत्रुघ्न बालुरे | ५२ | मुलगी |
| ७) | लक्ष्मीबाई भ्र. विनायक गरड | ४६ | सुन |
| ८) | बालाजी पि. विनायक गरड | ३० | नातु |
| ९) | गणेश पि. विनायक गरड | २९ | नातु |
| १०) | सुकन्या पि. विनायक गरड | २७ | नात |

अर्जदार नामे सुभाष पि. रामजी गरड रा. बोरोळ ता.देवणी जि.लातूर या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरु-पात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २१/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २३/१०/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

---

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७६२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Laxman S/o. Sidram Kamble हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur दि. १६/०८/२०२४ रोजी At. Udgir Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Pushpa W/o. Laxman Kamble, Age 55,
2) Akash S/o. Laxman Kamble, Age 33, Occu- Pvt. Service R/o. Udgir Tq.Udgir Dist.latur
3) Rohini D/o Laxman Kamble, Age 28

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Pushpa W/o. Laxman Kamble | 55 | Wife |
| 2) | Akash S/o. Laxman Kamble | 33 | Son |
| 3) | Rohini D/o Laxman Kamble | 28 | Daughter |

अर्जदार यांना Laxman S/o. Sidram Kamble या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Laxman S/o. Sidram Kamble याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/११/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१९/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार अशोक काशिनाथ पांचाळ वय ६० वर्ष रा. वांजरवाडा ता. जळकोट जि. लातुर यांच्या बहीणीच्या नामे लताबाई काशिनाथ पांचाळ यांचा जन्म मौजे वांजरवाडा ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०५/०६/१९६६ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील लताबाई काशिनाथ पांचाळ जन्म ०५/०६/१९६६ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी लताबाई काशिनाथ पांचाळ यांचा जन्म दिनांक ०५/०६/१९६६ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु लताबाई काशिनाथ पांचाळ यांचा जन्म दिनांक-०५/०६/१९६६ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वांजरवाडा ता.जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २६/०९/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २७/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १२१/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार गणेश विश्वनाथ घाळे, रा. विळेगाव ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे वडील नामे विश्वनाथ रामशेट्टी घाळे हे दिनांक ३१/०७/२०२४ रोजी मौजे विळेगाव ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झालेले असुन ते मौजे विळेगाव ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | तेजम्मा विश्वनाथ घाळे | ७६ | पत्नी |
| २) | प्रकाश विश्वनाथ घाळे | ४६ | मुलगा |
| ३) | गणेश विश्वनाथ घाळे | ४५ | मुलगा |

अर्जदार गणेश विश्वनाथ घाळे, रा. विळेगाव ता.देवणी जि.लातूर या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरु-पात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०७/१०/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

# उमेद च्या मागण्या आचारसंहितेपूर्वी महाराष्ट्र शासनाने मान्य कराव्यात : व्यंकटराव पनाळे लोकाधिकारप्रमुख



लातूर :- (प्रतिनिधी) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने एक दिवसाचे उपोषण आज दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले. संपूर्ण जिल्ह्यातून या उपोषणासाठी महिला भगिनी व कर्मचारी उपस्थित होते. या आंदोलकासमोर लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांनी आपले विचार व्यक्त करत असताना उमेद च्या मागण्या रास्ता आहेत. मागील १०-१२ वर्षापासून सेवा देत असलेल्या उमेदच्या कर्मचाऱ्यांना शासनाने सेवेत कायम समाविष्ट करून घेणे अत्यावश्यक आहे.

शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालय अंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कंत्राटी अधिकारी कर्मचारी यांना शासनाच्या समक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्यात यावे असेही आवाहन लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार एकनाथराव शिंदे यांना याप्रसंगी बोलताना केले. उमेद महिला व कर्मचारी संघटना लातूरच्या वतीने एकदिवसीय उपोषण करून उमेद कर्मचारी व समुदाय संसाधन महिलांच्या विविध मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत सुरू आसलेल्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानात कार्यरत सर्व कर्मचारी व समुदाय संसाधन महिला कर्मचारी संघटनांच्या वतीने लातूर जिल्हाधिकारी कार्यालय समोर एकदिवसीय उपोषण व मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

उमेद अभियानास शासनाचा स्वातंत्र्य विभाग म्हणून मान्यता द्यावी , अभियानात कार्यरत कॅडर यांना आशा कार्यकर्ती तसेच अंगणवाडी कार्यकर्ती समकक्ष पदाचा दर्जा देऊन १० हजार पर्यंत मानधनात वाढ करावी. तसेच उमेद कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करावे अशा प्रमुख मागण्या जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे पाठविण्यात आल्या आहेत.

वरील मागण्या संदर्भात उमेद महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने यापूर्वी देखील आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात आले होते परंतु शासनाने याबाबत लेखी आश्वासन देऊन त्याची अंमलबजावणी केलेली नसल्याने पुन्हा एकदा संपूर्ण राज्यभर उमेद कर्मचारी यांच्या वतीने जो पर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तो पर्यंत आंदोलनाचा कृती कार्यक्रम आराखडा तयार केला असून आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे.

आज लातूर उमेद महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या या एकदिवसीय आंदोलनात जिल्ह्यातील उमेद अभियानात कार्यरत जिल्ह्यातील सर्व समुदाय संसाधन तसेच सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व तालुका तसेच जिल्हा संघटना पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# दैनंदिन आरोग्यासाठी आयुर्वेदाचे महत्त्व व औषधी वनस्पतीचा वापर या विषयावर दयानंद विज्ञानमध्ये व्याख्यान



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागातर्फे म दैनंदिन आरोग्यासाठी आयुर्वेदाचे महत्त्व व औषधी वनस्पतीचा वापर म या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे तर प्रमुख वक्ते म्हणून कै.बी. व्ही.काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक व द्रव्यगुण विभागाच्या विभाग प्रमुख डॉ.वर्षा खानापूरकर उपस्थित होत्या.यावेळी डॉ. वर्षा खानापूरकर यांनी दैनंदिन जीवनातील आयुर्वेदाचे महत्त्व विशद केले व तुळशी,अडूळसा, कोरफड,हळद,सर्पगंधा,अश्वगंधा इत्यादी वनस्पतीचे महत्त्व पटवून दिले तसेच आरोग्य सुदृढ राहण्यासाठी विद्यार्थ्यांची दिनचर्या कशी असली पाहिजे याबद्दल मौलिक मार्गदर्शन केले.

वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी यांनी औषधी वनस्पतीचा दैनंदिन जीवनात वापर पूर्वापार होत आलेला असून त्याचा वापर होणे आवश्यक आहे असे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ.प्रमोद माने यांनी केले.यावेळी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा.शिवाजी आळणे,डॉ.मनीषा गुरमे,प्रा.ए.एस.कांबळे, प्रा.एन. एन.शेख,प्रा.व्ही. व्ही. हवालदार, प्रयोगशाळा सहाय्यक पी.एस.पाटील,एन. डी.भालेराव,एन.आर.बाहेती तसेच डॉ.शेटकार रामशेट्टी,कवी योगीराज माने, डॉ.ईशा माने, राजेसाहेब पांचाळ, हरिओम पाटोळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया मुंडे यांनी व साधन व्यक्तीचा परिचय मंजुषा नाईकवाडी यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रा.एन.आर. सुडे यांनी मानले.या कार्यक्रमाला पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# अतिवृष्टीनंतर पालिकेची यंत्रणा गतिमान अवघ्या कांही तासात परिस्थिती नियंत्रणात




लातूर/प्रतिनिधी:मंगळवारी पहाटे व सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला. यानंतर शहरातील सखल भागात पाणी साठले.

कांही घरातही पाणी शिरले होते.यानंतर मनपाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी रवाना होत उपाययोजना केल्या व परिस्थिती पूर्वपदावर आणली.

मंगळवारी पहाटे व सायंकाळी ५ ते ७ या कालावधीत शहरात जोरदार पाऊस झाला. यामुळे इस्लामपुरा,कॉइल नगर,नांदगाव वेस,डी मार्ट परिसर,रिंग रोड,राजीव गांधी चौकातील सह्याद्री हॉस्पिटल,विराट हनुमान, सौभाग्य नगर,रामरहीम नगर,उस्मानपुरा,नाना नानी पार्क या भागात पाणी साठले.इस्लामपुरा येथील २०,उस्मानपुरा भागात १० आणि तुळशीधाम परिसरातील ८ ते १० घरात पावसाचे पाणी शिरले होते. याची माहिती मिळताच मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणे मार्फत ३ अग्निशमन वाहने व २ इंजिन तसेच स्वच्छता विभागाचे ३ इंजिन व ६ जेसीबी मार्फत पाणी काढून देण्याची कार्यवाही करण्यात आली.अनेक ठिकाणी जेसीबीद्वारे पाण्याला रस्ता करून देण्यात आला.काही ठिकाणी इंजिन वापरून घरातील पाणी नाल्यात सोडण्यात आले. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी रात्रभर मऑन फिल्डफहोते. आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सुचना केल्या. ज्या भागातून नागरिकांचा दूरध्वनी आला त्या भागात तात्काळ अधिकारी व कर्मचारी पाठविले जात होते.यामुळे साठलेल्या पाण्याचा लवकर निचरा करून परिस्थिती पूर्वपदावर आणणे शक्य झाले. आपत्तीच्या काळात नागरिकांना पालिकेस माहिती देता यावी यासाठी मनपात आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत आहे.आपत्तीच्या काळात नागरिकांनी ०२३८२-२५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची पदवी व पदव्युत्तर उन्हाळी परिक्षा २०२४ मध्ये उज्ज्वल यशाची परंपरा कायम

लातूर / प्रतिनिधी- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय द्वारा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या पदवी आणि पदव्युत्तर उन्हाळी परीक्षा - २०२४ मध्ये उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

पदव्यूत्तर विभागातील एम. ए. तत्त्वज्ञान विभागातील कु. सूर्यवंशी साक्षी बालाजी हिने १४६३ (८६.०६%) गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम तर कु. सूर्यवंशी वैशाली वैजनाथराव हिने १३९० (८१.७६%) गुण घेऊन विद्यापीठात सर्वद्वितीय आणि राठोड अजय श्रीकांत यांनी ११०८ (६५.१८%) गुण घेऊन विद्यापीठात सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळविला आहे.

एम. ए. समाजशास्त्र विभागातील कु. माने पूजा गोविंद हिने १२६९ (७४.६५ टक्के) गुण घेऊन विद्यापीठात सर्वद्वितीय तर हनमंते तानाजी नवनाथ याने १२६७ गुण (७४.५३ टक्के) घेऊन विद्यापीठात सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळविला आहे.

समाजकार्य पदवी अभ्यासक्रम (बी.एस.डब्ल्यू.) मध्ये समाजकार्य विभागातील कु. काबंळे पूजा साहेबराव ही ३२९५ (८६.९१ टक्के) गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे तर शेख सुमेय्या दस्तगीर यांनी ३२१२ गुण (८४.५३ टक्के) घेऊन विद्यापीठात सर्व द्वितीय येण्याचा बहुमान मिळविला आहे.

या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे व संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरूळे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशिनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. दत्ता करंडे, प्रा. नागेश जाधव, प्रा. प्रकाश राठोड, समाजशास्त्र विषयाचे प्रा. बबन पवार, प्रा. बसवराज पाटील, प्रा. कर्वा, प्रा. दयांनद बोयणे, प्रा. अलका चिखुर्डेकर, प्रा. श्रीराम देशपांडे आदीनी मनः पूर्वक हार्दिक अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वच्छता ही सेवा अंतर्गत नेहरु युवा केंद्रामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन

लातूर /प्रतिनिधी- स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील नेहरू युवा केंद्रामार्फत स्वच्छता शपथ , नुक्कड नाटक , स्वच्छता रॅली, वाल रायटिंग, स्वच्छता अभियान संपूर्ण लातूर जिल्ह्यात राबविले जात आहे.

२५ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर नेहरू युवा केंद्र व दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क व गांधी चौकात स्वच्छता अभियान राबविले गेले. तसेच चाकूर व रेणापूर तालुक्यामध्ये वॉल रायटिंगच्या माध्यमातून स्वच्छतेची जनजागृती करण्यात आली. त्याच बरोबर लातूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये स्वच्छता जनजागृती व शपथ देण्यात आली.

२६ सप्टेंबर, २०२४ रोजी नेहरू युवा केंद्र व दयानंद कला महाविद्यालय यांच्यावतीने दयानंद महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. त्या कार्यक्रमात ङ्गमाय भारतफ स्वयंसेवक , एनएसएस, एनसीसी, व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात कला महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गायकवाड, जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैय्या, उप प्राचार्य दिलीप नागरगोजे , प्रा. गोपाळ बाहेती , प्रा. जगताप,प्रियंका मोरे, प्रशांत साबणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.




# स्वच्छता ही सेवा अंतर्गत नेहरु युवा केंद्रामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन

लातूर, / प्रतिनिधी- स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील नेहरू युवा केंद्रामार्फत स्वच्छता शपथ , नुक्कड नाटक , स्वच्छता रॅली, वाल रायटिंग, स्वच्छता अभियान संपूर्ण लातूर जिल्ह्यात राबविले जात आहे.

२५ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर नेहरू युवा केंद्र व दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क व गांधी चौकात स्वच्छता अभियान राबविले गेले. तसेच चाकूर व रेणापूर तालुक्यामध्ये वॉल रायटिंगच्या माध्यमातून स्वच्छतेची जनजागृती करण्यात आली. त्याच बरोबर लातूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये स्वच्छता जनजागृती व शपथ देण्यात आली. २६ सप्टेंबर, २०२४ रोजी नेहरू युवा केंद्र व दयानंद कला महाविद्यालय यांच्यावतीने दयानंद महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. त्या कार्यक्रमात ङ्गमाय भारतफ स्वयंसेवक , एनएसएस, एनसीसी, व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात कला महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गायकवाड, जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैय्या, उप प्राचार्य दिलीप नागरगोजे , प्रा. गोपाळ बाहेती , प्रा. जगताप,प्रियंका मोरे, प्रशांत साबणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार आक्रमक २८ रोजी शहरात भीक मागो आंदोलन

## १ ऑक्टोबर २०२४ पासून आमरण उपोषण

लातूर : लातूर जिल्हा रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न मार्गी लावण्यासाठी आता माझं लातूर परिवाराने आक्रमक पवित्रा घेतला असून २८ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर शहरात भीक मागून निधी जमा करण्याचा तर १ ऑक्टोबर २०२४ पासून परिवारातील अनेक सदस्य आमरण उपोषणाला बसणार असा इशारा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मनपा आयुक्त यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मंजूर असूनही प्रलंबित असलेला लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ पासून शासनदरबारी पाठपुरावा करण्यास सुरुवात केली होती. बेमुदत साखळी उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले. चक्क मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, पालकमंत्री यांना साकडे घातले. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी विनंती केली होती.

अखेर १९ जून २०२४ रोजी राज्य सरकारने आदेश काढून कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग करून ताब्यात घ्यावी असे निर्देश दिले. विशेष म्हणजे ही प्रक्रिया ६० दिवसात पुर्ण करावी असा स्पष्ट उल्लेख शासन आदेशात करण्यात आला. मात्र दुर्दैवाने ही मुदत संपून १ महिना उलटून गेला आहे. या संपूर्ण विषयाची सविस्तर माहिती वेळोवेळी पालकमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने प्रत्यक्ष भेटून, निवेदन सादर करून आणि ईमेल द्वारे देण्यात आली आहे. शासनाकडे लातूर जिल्हा रुग्णालयासाठी ३ कोटी निधी उपलब्ध नाही का? म्हणून २८ सप्टेंबर २०२४ रोजी शहरात भीक मागून निधी गोळा करण्यात येईल आणि १ ऑक्टोबर २०२४ पासून शहरातील गांधी चौक येथे परिवारातील अनेक सदस्य आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनात लातूरच्या सर्व सुजाण नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.










**विठ्ठल**

असा एकमेव देव ज्याच्या हातात शस्त्र नाही
असा देव ज्याचा अवतार नाही
अवतार नाही म्हणून जन्मस्थळ नाही
जन्मस्थळ नाही म्हणून पुढल्या कटकटी नाहीत, वाद तंटे नाहीत.
असा देव ज्याला अमुक पद्धतीने पुजल पाहिजे अस बंधन नाही. असा देव ज्याला माउली म्हटलं जात.
देव आई असण्याच हे उदाहरण दुर्मिळ.
असा देव जो शाप देत नाही, कोपत नाही, हाणामारी करत नाही.
कोणतीही विशिष्ट व्रतवैकल्य नाहीत...कोणताही विशिष्ट नैवेद्य नाही...कोणतीही आवडती फुले नाहीत...कोणताही आवडता पोशाख नाही...जशी आई आपल्या मुलाचा राग,रुसवा,नाराजी,दुःख सगळं सहन करते तसा हा विठुराया आपल्या भक्तांचे राग,रुसवा,नाराजी,दुःख सगळं सहन करतो म्हणूनच कदाचित त्याला पुरुष असूनही माऊली म्हणत असावेत.
रामकृष्ण हरी
**- सौजन्यः संजय खानापुरे !!**

# बालविवाह मुक्त लातूरसाठी चॅम्पियन्सचे दोन दिवसीय प्रशिक्षण उत्साहात

लातूर, / प्रतिनिधी- : जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण जास्त असून ते कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी व त्याबाबत योग्य ते नियोजन, अंमलबजावणी व निर्णय या कृती दलामध्ये घेण्यात येतात. त्यानुसार सक्षम बालविवाह निर्मूलन कार्यक्रमांतर्गत महिला व बालविकास विभाग, युनिसेफ, एसबीसी-३ व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य, पंचायत, शिक्षण, महिला व बालकल्याण आणि जिल्हा महिला व बालविकास विभाग मधील तालुकास्तरीय तसेच क्लस्टरमधील अधिकारी व कर्मचारी अशा ७५ अधिकारी



यांना दोन दिवसीय बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी केले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी एन.एस. मापारी,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे,एस.बी.सी.-३ संस्थापक तथा व्यवस्थापकीय संचालक निशित कुमार, तसेच एसबीसी ३ प्रकल्प प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बिडवे, विकास कांबळे, सिद्धाराम गायकवाड आणि श्रुती वाघमोडे यावेळी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये बालविवाहाची कारणे, महाराष्ट्रातील बालविवाहांचे प्रमाण, बालविवाह निर्मूलनासाठी सुरू असलेल्या 'सक्षम' प्रकल्पाविषयी माहिती, बालकांचे हक्क, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, पोक्सो कायदा २०१२, विभागनिहाय नियुक्त केलेल्या ईसीएम चॅम्पियन्स यांची भूमिका व जबाबदारी, त्यामध्ये बालविवाह निर्मूलनासाठी कार्यान्वय योजना आखून त्याप्रमाणे नियोजन करणे, साप्ताहिक देखरेखीचे अहवाल तयार करणे व त्यांचा नियमितपणे आढावा घेऊन कार्यालयास सादर करणे, बालविवाह निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यांचा अहवाल नियमितपणे गुगल लिंक मध्ये भरणे, जिल्हा कृती आराखड्यासाठी सर्व विभागांचे सहाय्य व नियोजन, केलेल्या कार्यांनुसार जिल्हा कृती दल बैठकीमध्ये सादरीकरण अहवाल तयार करणे इत्यादी गोष्टींची माहिती व मार्गदर्शन प्रशिक्षणामध्ये करण्यात आले.

या दोन दिवसीय प्रशिक्षणासाठी बालविवाह निर्मुलन जिल्हा कृतीदल सदस्य सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, जिल्हा परिषद लातूर यांच्या मार्गदर्शनाने प्रमुख प्रशिक्षक म्हणून एसबीसी-३ संस्थापक निशित कुमार, प्रकल्प प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बिडये यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमासाठी एसबीसी-३ वरिष्ठ प्रकल्प समन्वयक विकास कांबळे आणि सिध्दाराम गायकवाड, प्रकल्प समन्वयक श्रुती वाघमोडे, कम्युनिकेशन समन्वयक रूचिका अहिरे यांनी प्रशिक्षण यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

# मंजिरी सखी प्रोड्यूसर कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पडली पार



धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - मंजिरी सखी प्रोड्यूसर कंपनीचे वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेसाठी ६०० महीला सभासद उपस्थित होत्या.

या सभेस धाराशिव तालुका कृषी अधिकारी एस पी जाधव, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक नागेश उगलमुगले तसेच सेंद्रिय शेतीचे मास्टर ट्रेनर अतुल पाटील, मंडळ कृषी अधिकारी शेरखाने, महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रज्ञा बनसोडे,

महिला बालविकास समुपदेशनच्या शारदा गंडले, ऍक्सिस बँकेच्या वर्षा, शितल यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. तर स्वयंम शिक्षण प्रयोगच्या असोसिएशन कार्यक्रम संचालिका नसीम शेख यांनी प्रस्ताविकामध्ये एसएसपी संस्थेच्या कामाबद्दल सविस्तरपणे माहिती विषद केली. तसेच प्रियंका शिंदे यांनी मंजिरी सखी प्रोडूसर कंपनी अंतर्गत करण्यात आलेले काम व भविष्यात करण्यात येणाऱ्या कामांची माहिती सविस्तरपणे सांगितली. या कार्यक्रमास मंजिरी प्रोड्यूसर कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिपाली थोडसरे, सचिव राणी शिराळ, संचालिका कोमल कटकटे, कौशल्य कटकटे, रेखा गडदे, सुरेखा ढवळे आदींसह १५ गावांमधील ६०० महिला उपस्थित होत्या.

# भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

लातूर/प्रतिनिधी :- नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने हैदराबाद मुक्ती संग्रामाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने प्रवीण सरदेशमुख यांनी लिहिलेल्या भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी होणार आहे.याच कार्यक्रमात राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच वयाची ८० वर्ष केल्याबद्दल राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळाही आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास राज्याचे क्रीडा व युवकल्याण मंत्री संजय बनसोडे,माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर,आ.रमेशअप्पा कराड व आ.अभिमन्यू पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रवीण सरदेशमुख लिखित या पुस्तकात हैदराबाद मुक्ती संग्रामातील १२ प्रमुख महापुरुषांचे चरित्र व लढ्याचा इतिहास वर्णन करण्यात आला आहे. बागडे यांच्या सन्मान सोहळ्यासोबतच या कार्यक्रमात जिल्ह्यातील ज्येष्ठ व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिकांचे नातेवाईक व राष्ट्रीय विचाराने कार्य करणाऱ्या शिक्षण संस्था प्रमुखांचा सन्मानही करण्यात येणार आहे. शनिवार दि.२८ रोजी दुपारी ३.३० वाजता दयानंद सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. कार्यक्रमाच्या वेळेपूर्वी १५ मिनिटे सभागृहात स्थानापन्न व्हावे. सभागृहातील समोरील १० रांगा मान्यवरांसाठी आरक्षित करण्यात आल्या असून त्यासाठी प्रवेशिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमास येताना नागरिकांनी कॅमेरा, मोबाईल,पाण्याची बाटली व तत्सम वस्तू आणू नयेत,असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख,उपाध्यक्ष महेंद्र जोशी,कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी,कार्यवाह अशोक शिवणे,ड.सौ. प्रणाली रायचुरकर,सुधीर धुतेकर,शैलेश कुलकर्णी, संजय गुरव,सौ.प्राजक्ता सरदेशमुख,किशोर कुलकर्णी,उमेश सेलुकर व चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

# परिस्थितीनुसार दुरुस्त्या मात्र मुळ राज्य घटना कोणालाही कदापी बदलता येणार नाही :प्राचार्य जटनुरे

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - भारतीय संविधान उद्देशिकातील आम्ही भारताचे लोक, भारताचे सार्वभौम हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तर आतापर्यंत १०७ वेळा घटनेत दुरुस्ती केली असून मुळ राज्य घटना कोणालाही कदापी बदलता येणार नसल्याचे प्रतिपादन डायटचे प्राचार्य दयानंद जटनूरे यांनी दि.२६ सप्टेंबर रोजी केले.

भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समितीच्यावतीने भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. प्रत्येक महिन्याच्या २६ तारखेला विविध तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. धाराशिव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भारत व संविधान या विषयावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठवाडा



मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक बुबासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून पुरातत्त्वज्ञ रविंद्र शिंदे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एम.एस. बिरादार, लेखक विजय गायकवाड, ऍड अजय वागाळे, मतदार जनजागरण समितीचे सचिव अब्दुल लतिफ, उपाध्यक्ष गणेश वाघमारे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य जटनूरे यांनी प्राचिन भारत, संस्कृती, परकीयांची आक्रमणे, ब्रिटिश सरकारचे कायदे आणि भारतीय संविधानातील कायदे विषयक बाबींवर प्रकाश टाकला. तर प्राचार्य बिरादार म्हणाले की, संविधान विषयी जागरुक राहून भारतीय संविधान अमृत महोत्सव आपण सर्वांनी साजरा केला पाहिजे. तसेच संविधान आपणाला जगायला शिकविते असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी संविधान मंदिरातील संविधान उद्देशिका प्रती व विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन व दिप प्रज्वलन करण्यात आले.मतदार जनजागरण समितीचे संघटक संजय गजधने, कोषाध्यक्ष रऊफ शेख, सदस्य बाबासाहेब गुळीग, पत्रकार श्रीकांत गायकवाड, बलभीम कांबळे, बी.के. बनसोडे, छत्रपाल वाघमारे, शिक्षक किरण झरकर, पी.एस. गाडेकर, एफ.बी. जगताप, बालाजी वाघमारे, व्ही.एम. धनशेट्टी, रविंद्र जगदाळे, एस.एन. ओव्हाळ, डी.जी. गुडे, जी.व्ही. कुलकर्णी, के डी नाईक, आर.डी. येरकळ, एफ. डी. सुरवसे, एम.ए. चौधरी, के.आर. जुबेरी, पुनम, श्रृतिका यादव, दिनेश इंगळे, पांडुरंग भोकरे, माधव टेकाळे, एस.व्ही. शिंदे, एच.डी. बोर्डे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. प्रस्तावना अब्दुल लतिफ यांनी तर सूत्रसंचालन प्रा.मनोज चौधरी यांनी व आभार प्राचार्य एम.एस. बिरादार यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता भारतीय संविधान उद्देशिकेच्या सामुदायिक वाचनाने करण्यात आली.

## पान १ वरून

### देशातील....

प्रवासी ट्रॅफिकमध्ये न अडकता काही मिनिटांत टर्मिनल ३ आणि टर्मिनल २ पर्यंत पोहोचू शकतात. या एअर ट्रेनच्या मार्गाची एकूण लांबी ७.७ किलोमीटर असणार आहे. योजनेनुसार, या एअर ट्रेनचे टर्मिनल १, टर्मिनल २ आणि टर्मिनल ३ तसेच एरोसिटी आणि कार्गो सिटी असे थांबे असतील. मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प २०२७ च्या अखेरीस पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी डायलने निविदाही काढली असून या निविदेची निविदा प्रक्रियाही ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे. या संपूर्ण प्रकल्पाची एकूण किंमत जवळपास दोन हजार कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

येत्या काही वर्षांत भारतातील पहिली एअर ट्रेन दिल्ली विमानतळावर धावणार आहे. दरम्यान, जगातील अनेक देशांमध्ये अजूनही एअर ट्रेन धावतात. ज्यामध्ये चीन, न्यूयॉर्क, जपानसह अनेक देशांची नावे आहेत.

कशी धावते एअर ट्रेन?

एअर ट्रेनला ऑटोमेटेड पीपल मूव्हर असेही म्हणतात. एक स्वयंचलित ट्रेन प्रणाली, ज्याचा उपयोग विविध टर्मिनल्स आणि विमानतळावरील इतर महत्त्वाच्या ठिकाणांना जोडण्यासाठी केला जातो. माहितीनुसार, भारतात सुरू होणारी एअर ट्रेन एकतर पीलर आणि स्लॅबच्या आधारे हवेत धावणारी मोनोरेल असेल किंवा ती जमिनीवर धावणारी 'ऑटोमॅटिक पीपल मूव्हर एअर ट्रेन' असू शकते.

### झुकेरबर्ग...

वाढली आहे. झुकरबर्ग मेटा प्लॅटफॉर्मर्सद्वारे फेसबुक, व्हॉटसअप, इन्स्टाग्राम आणि थ्रेडस हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म चालवते. सोशल मीडिया क्षेत्रात मेटाचं मोठं वर्चस्व निर्माण झालं आहे. त्यामुळं झुकरबर्गच्या संपत्तीत वेगानं वाढ झाल्याचा पाहायला मिळतं.

बर्नार्ड अरनॉल्ट २०० बिलियन डॉलर्सच्या क्लबपासून थोडे दूर राहिले. त्यांची सध्याची नेटवर्थ १८३ बिलियन डॉलर्स आहे. डेटाबेस कंपनी ओरॅकलचे लॅरी एल्लीसन यांची नेटवर्थ १८९ बिलियन डॉलर्स आहे. बर्नार्ड अरनॉल्टच्या संपत्तीत २४.२ बिलियन डॉलर्सची घट झाली आहे. तर लैरी एल्लीसनच्या नेटवर्थमध्ये ५५.६ बिलियन डॉलर्सची वाढ झाली आहे.

भारतात मुकेश अंबानी १ नंबरवर

ब्लूमबर्ग बिलियनयर इंडेक्सनुसार भारतातील सर्वात श्रीमंत उद्योजक मुकेश अंबानी आहेत. रिलायंस इंडस्ट्रीजचे चेयरमन मुकेश अंबानी यांच्या जवळ ११३ बिलियन डॉलर्सची संपत्ती आहे. अदानी समुहाचे चेअरमन गौतम अदानी यांच्याजवळ १०५ बिलियन डॉलर्सची संपत्ती आहे.

### भारतीय एके...

देशांद्वारा रशियावर निर्बंध घालणे जबाबदार ठरले आहे. या प्रतिबंधांमुळे या रायफली रशियातून विक्री होणे बंद झाले. त्यामुळे भारत आणि रशियात तयार होणा-या या रायफली विकून भारताचा फायदा झाला आहे.

### बहुराष्ट्रीय...

जीसीसी चा विस्तार पुढील काही वर्षांमध्ये देशात मोठी रोजगारनिर्मिती करणार आहे. ङ्गजीसीसीफ्मध्ये सध्या १९ लाख कर्मचारी संख्या आहे. २५-२८ लाखांपर्यंत कर्मचारी संख्या पोहोचू शकते.

९ लाख ते ४३ लाख रुपये एवढे वार्षिक वेतन ङ्गजीसीसीफ्मध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर्सना मिळत आहे. त्यातुलनेत आयटी कंपन्यांमध्ये ६ ते १८ लाख रुपये वार्षिक वेतन मिळत आहे, असे टीमलीजच्या डिजिटल स्किल्स अहवालात म्हटले आहे.

### गॅस कनेक्शन...

जोडणी आवश्यक. ३१ जुलैपूर्वीचे कनेक्शन पात्र

या योजनेसाठी ३१ जुलै २०२४ पूर्वीचे गॅस कनेक्शन ग्रा धरले आहेत. ३१ जुलैपूर्वी ज्या महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन आहेत, त्यांनाच याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे आता कनेक्शन महिलेच्या नावावर हस्तांतरित करून उपयोग होणार नाही.

पुरुषप्रधानतेचा फटका

जिल्ह्यात ९ लाखांवर महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला आहे; पण त्यापैकी फक्त अडीच लाख महिलांना तीन सिलिंडर मोफत मिळतील. समाज कितीही पुढारलेला असला तरी घर, जागेचा सातबारा, बँकांचे खाते, कर्ज, लाईट बिल, पाणी बिल, गॅस कनेक्शन अशा महत्त्वाच्या बाबी पुरुषांच्याच नावे असतात. आता शासनाने योजनांच्या लाभासाठी अट घातल्याने महिलांच्या नावावर किमान बँक खाते तरी उघडले जात आहे, अन्यथा पूर्वी महिलांची खातीदेखील कमी होती.

### ९० देशांना....

तेव्हापासून १० वर्षांनी संरक्षण क्षेत्रासमवेत प्रत्येक क्षेत्रात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. मागील काही वर्षांमध्ये सरकारने देशांतर्गत संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि विशेषकरून चीनला लागून असलेल्या सीमेवर सैन्य सज्जतेला मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आल्याची माहिती राजनाथ सिंह यांनी दिली आहे.

### एकता फाउंडेशनचे...

येथे झालेल्या पहिल्या साने गुरुजी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेल्या धनंजय गुडसूरकर यांचा लेखन व वाचनाचा दांडगा व्यासंग आहे.

एकता फाउंडेशनने साहित्य क्षेत्रात विविध उपक्रम राबविले असून एकता काव्य संमेलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नामवंत कवींच्या कवी संमेलनाचे आयोजन केले असल्याची माहिती एकता फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड यांनी दिली. या कवी संमेलनाचा रसिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन एकता फाउंडेशनचे प्रदेश संघटक देविदास शिंदे , मराठवाडा विभागीय अध्यक्ष डॉक्टर प्रकाश वाकळे, एकता फाउंडेशनचे उपाध्यक्ष नितीन कैतके, उपाध्यक्ष श्रीमती मीरा दगडखैर. सचिव गोकुळ पवार, सहसचिव लखुळ मुळे, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, सल्लागार एडवोकेट भाग्यश्री ढाकणे महिला आघाडी प्रमुख श्रीमती रंजना फुंदे यांनी केले आहे.

### मुरुड अकोला...

जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख, भैरवनाथ पिसाळ, काशिनाथ ढगे, चंद्रकांत वांगस्कर, धनराज शिंदे, सुधाकर गवळी, अशोक सावंत, बाबासाहेब भिसे, विश्वास कावळे, वैभव मगर, ज्ञानेश्वर जुगल, शुभम खोसे, सुरेश सूर्यवंशी, बाळासाहेब चौंडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मयत बालाजी यांचे वडील पांडुरंग गडदे, भाऊ दयानंद गडदे, मुलगी तेजस्विनी गडदे त्याचबरोबर मुरुड अकोला येथील शरणाप्पा बिडवे, रामेश्वर गिराम, अशोक बिडवे, शिवरत्न बिडवे, वैभव मस्के, संगमेश्वर बिडवे, भीमा चौंडे, रोहित शेंडगे, भैय्या मस्के, कल्याण बिडवे, वैभव मस्के, विनोद भुतडा, अण्णा पांढरे, प्रकाश बिडवे, राहुल शेंडगे, परमेश्वर कुर्डे यांच्यासह अनेक जण होते.

### वचनपत्राची...

एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला होता. अट रद्द करण्याच्या निर्णयाचे एसटी कर्मचारी संघटनांनी स्वागत केले आहे.

वेतनाची थकबाकी पाच मासिक हप्त्यांत

१ एप्रिल ते ३१ ऑगस्ट या काळात सेवानिवृत्ती, राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती, बडतर्फी, निधन, वैद्यकीयदृष्ट्या अपात्र वा अन्य कारणांमुळे पटावरून कमी झालेल्या कर्मचा-यांनाही सुधारित वेतनाची थकबाकी सप्टेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ या पाच महिन्यांत समान हप्त्यांत देण्यात येणार आहे. राज्य परिवहन महामंडळातील कर्मचा-यांना एप्रिल २०२० पासून मूळ वेतनामध्ये ६५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय सरकारच्या मध्यस्थीने घेण्यात आला.

### मुरुडमधील...

फर्निचर आदी ४० हून अधिक दुकानांची पाहणी केली. या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्तांना एनडीआरएफ निकषांप्रमाणे सरकारने मदत द्यावी, अशी मागणी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केली.

आमदार धिरज देशमुख यांच्या सूचना

पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज असल्याने प्रशासनाने दक्ष रहावे , येथे पुन्हा पुर स्थिती उद्भवणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. झालेल्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्तांना एनडीआरएफ निकषांप्रमाणे मदत द्यावी. सर्व नुकसानीचा दिवसभरात पंचनामा करून शासनाला तत्काळ अहवाल सादर करावा, पीकविमाधारक शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद ऑनलाईन व ऑफलाईन घेण्यात यावी. मागील वर्षीचाही विमा येथील शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यामुळे प्रत्येक वेळी नुकसानीची भरपाई देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपनीला सक्त ताकीद द्यावी. पूरस्थितीमुळे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याचा येथे धोका आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने योग्य ती खबरदारी घेवून तपासणी शिबिर घ्यावे.

## जाहीर प्रगटन

निलंगा व लातूर जिल्हयातीत सर्व जनतेला, वित्त संस्था, पतसंस्था बैंक यांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की निलंगा नगर परिषद हद्दीतील जमिन गट नं. २८२/अ/२ मधिल प्लॉटक १० ज्याचा क्षेत्रफळ (२०९.१०) ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट पूर्व पश्चिम-४५ फुट आहे. प्लॉट ची नामे भगवान लक्ष्मणराव खरटे यांचा खरेदीखत व फीस भरल्याची पावती. दस्त क्र. २६३५/१९९० दिनांक २५/०९/१९९० ला झालेला दस्त व संजय पांडुरंग कोकणे ज्याचा दस्त क्र.२६१४/१९९६ दि १०/१०/१९९६ आणखी एक झालेला चुकदुरुस्ती चा दस्त क्र.२७५९/१९९६ दिनांक १५/११/१९९६ दोन्ही दस्ताची मुळ रजिस्ट्रेशन फीस भरल्याची पावली (ओरिजनल कोपी) तसेच इतर दस्तऐवज कोळळे महारुद्र दयासागर रा. महालक्ष्मी कॉलनी, दापका रोड, निलंगा ता. निलंगा जि लातूर यांच्याकडून दि. ०६/०९/२०२४ रोजी

| SERIAL NO. | NAME AND PARTICULARS OF THE DOCUMENT | DATE OF EXECUTION | EXECUTANTS |
|---|---|---|---|
| 1. | Original S.R.R Receipt And original Sale deed No. 2635/1990 Dated 25/09/1990 are (original S.R.R &Sale Deed missing) | 1990 | (Buyer) Mr.Baburao Dhondiba Kamble Vs (Seller) Mr. Bhagwan Laxmanrao Kharte |
| 2. | Original S.R.R Receipt Missing of Sale deed No. 2614/1996 Dated 10/10/1996 are (original S.R.R missing) | 1996 | (Buyer) Mr.Sanjay Pandurang Kokane Vs (Seller) Mr. Bhagwan Laxmanrao Kharte |
| 3. | Original S.R.R Receipt Missing of Sale deed No. 2759/1996 Dated 15/11/1996 are (original S.R.R missing) | 1996 | (Buyer) Mr.Sanjay Pandurang Kokane Vs (Seller) Mr. Bhagwan Laxmanrao Kharte |

सकाळी अकरा वाजता दुय्यम निबंधक कार्यालय निलंगा येथून गहाळ झाली आहे तरी कोणास काही हरकत असेल किंवा गहाळ झालेल्या पावती सापडल्यास संपर्क साधावा.

**प्रगटन देणार**
**कोळळे महारुद्र दयासागर रा. महालक्ष्मी कॉलनी, दापका रोड**
**निलंगा ता. निलंगा मोबा. ९८९०६५४१४९**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवींवर नियम व अटी लागू.



# यशवंत

शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४



# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# शेतकऱ्यांना पिकविम्यासह नैसर्गिक आपत्तीचे अनुदान मिळवून देणार : क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे

## *शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीसाठी शासन कटिबध्द*



**उदगीर (प्रतिनिधी)** जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी आपले महायुतीचे सरकार खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांना वीज, पाणंद रस्ते, विहीरी, मागेल त्याला शेततळे व गोठे यासह पोखरा व अन्य योजनेतून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून मागील काळात आपल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले हो-ते त्याचेही पंचनामे करून शेतकऱ्यांना पिकविम्यासह नैसर्गिक आपत्तीचे अनुदान मिळवून देणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते उदगीर येथे आयोजीत प्रधानमंत्री पिक विमा योजना आढावा बैठकीत शेतक-यांना संबोधित करत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे,माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, जिल्हा कृषी अधिकारी आर .टी. जाधव, एस.बी. आय विमा कंपनीचे राज्य व्यवस्थापक अक्षय ढोणे, जिल्हा समन्वयक तौसीफ्फ कुरेशी, उपविभागीय कृषी अधिकारी राजेंद्र काळे, माजी उपसभापती रामराव बिराद-ार, जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर, श्याम डावळे, बालाजी भोसले, वसंत पाटील, धनाजी मुळे, ओम पाटील चिघळीकर, राजकुमार बिरादार, शंकर रोडगे, तुळशीराम बेंबडे, युवराज धोत्रे, लक्ष्मण जाधव, उदगीरचे कृषी अधिकारी संजय नाबदे, जळकोटचे कृषी अधिकारी आकाश पवार, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, लातूर जिल्ह्यातील ही पहिली बैठक असुन माझ्या शेतकरी बांधवांसाठी व मतदार संघातील जनतेच्या सेवेसाठी मागील ५ वर्ष मी आप-ला जनसेवक व लोकसेवक म्हणून काम केले.
मागील २ महिन्यात खुप अतिवृष्टी झाली असुन विविध मंडळात पिकांचे नुकसान झाले आहे.
मागच्या ४ सप्टेंबर रोजी म हामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या दौरा वेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या समवेत मी स्वतः शेतकरी बांधवांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी प्रशासनाला नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यामुळे शेतक-यांना योग्य तो मोबदला मिळणार आहे. लातुर जिल्ह्यात उदगीर - जळकोट या दोन तालुक्यातीलच नुकसानीचे पंचनामे जास्त झाली असल्याचे प्रशानाने आम्ह-ाला कळवले आहे. मतदार संघातील
१ लाख शेतकऱ्यांनी पिकविमा फॉर्म भरला आहे. मी सदैव शेतक-यांसाठी जागरुक असतो आपली आनेवारीनुसार शासन आपणास मदत करेल मी सर्वसामान्य कुटुंबातील कष्टकऱ्यांचा मुलगा आहे. मला शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणिव आहे म्हणूनच विमा कंपनीला सुचना देवून विमा मिळवून देण्यासाठी मी सतत प्रयत्न करत आहे. बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे. त्यांच्यावर कुठलाही अन्याय होवु देणार नाही. तालुक्यातील विविध गावात पोखरा योजना राबवणार असुन मतदार संघातील प्रत्येक गावात रस्ते, विज, पाणी, आरोग्याच्या सुविधा पुरविल्या असल्याचे सांगितले.

यावेळी उदगीर तालुक्यातील सोसायटीचे चेअरमन व संचालक, कृषी विभागाचे व विमा कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

# स्व. जनाबाई वडणे यांचे मरणोत्तर देहदान

**लातूर (प्रतिनिधी)** येथील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या एडवोकेट मीना-ताई गायकवाड यांच्या मातोश्री स्व. जनाबाई हरिदास वडणे वय ८० यांचे नुकतेच निधन झाले .जनाबाई यांनी दहा वर्षांपूर्वी देहदानाचा फॉर्म सोला-पूर येथे भरून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला होता. मरणानंतरही आ-पला देह समाजाच्या कामी यावा या हेतूने त्यांनी त्या काळात देहदान करण्याचा संकल्प जाहीर केला .यापूर्वी त्यांच्या घराण्यात कोणीही तसा संकल्प केलेला नव्हता. तशी परंपराही या कुटुंबामध्ये नव्हती .परंतु



जनाबाईनी आपल्या पुढच्या पिढीमध्येही समाजभान जागृत ठेवण्याचा संदेश आपल्या देहदानातून दिला. या संकल्पानुसार परवा त्यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा देह येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला दान करण्यात आला. जनाबाईचे जावई प्राचार्य धनंजय गायकवाड , भाजपा नेत्या डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर,आणि चिरंजीवांबरोबरच कन्याही उपस्थित होत्या .यावेळी अनेकांनी स्वर्गीय जनाबाईच्या सामाजिक बांधिलकीबद्दल व त्यांच्या धाडसी निर्णयाबद्दल कौतुक केले .या देहदानातून प्रेरणा घेऊन याच दिवशी आणखी तीन व्यक्तींनी देहदानाचा फॉर्म भरून आपला देहही मरणोत्तर राखेच्या स्वाधीन करण्यापेक्षा समाजहितासाठी देण्याचा संकल्प केला, हे विशेष.

# नगर पंचायत कार्यालय, जळकोट जि.लातूर

जा.क्र.२०२४/न.प.अ-बां.वि/कावि-५/ दिनांक २७/०५/२०२४

निविदा सुचना
नगर पंचायत कार्यालय, जळकोट जि.लातूर

जळकोट नगर पंचायत जळकोट जि.लातूर नोंदणीकृत या मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून खालील कामासाठी वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेतून अंतर्गत निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपली निविदा भरण्यासाठी खालील अटी व शर्ती नुसार निविदा भरण्यासाठी कार्यालयीन वेळे मध्ये कोरी निविदा उपलब्ध होतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविधा धारकाचा वर्ग | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | कोरी निवीदा फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | करार करतेवेळी २ % | विलातून कपात ८ % | | |
| ३ | वैशिष्टपुर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेतून प्रभाग क्र. १७ मध्ये मोहमदिय्या सज्जिद ते अंगद पांचाळ घरापर्यंत नाली बांधकाम करने. | ८,१४,३४९ | वर्ग ५ ब त्यावरील | ८१४४/- | ६५,२८७ | ६५,१८८/- | ६ महिने | १०००/- |


निविदा फॉर्म प्राप्त करण्याचा व भरण्याच्या अटी व शर्ती खाली नमुद केल्या प्रमाणे राहतील.
१) निविदेची सर्व माहिती दि. २७/०९/२०२४ ते दि. ०३/१०/२०२४ पर्यंत न.प. कार्यालयात उपलब्ध होतील.
२) निविदा घेणे व दाखल करणे साठी चा कालावधी दि. २७/०९/२०२४ ते दि. ०३/१०/२०२४ रोजी १७:०० वाजे पर्यंत राहील.
३) वरील प्रक्रिया द्वारे प्राप्त झालेल्या निविदा दि. ०४/१०/२०२४ रोजी ११:०० वाजता (शक्य झाल्यास) किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल, त्या वेळी न.प. कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.
४) निविदा सोबत वरील नमूद प्रमाणे सार्वजनीक बांधकाम विभाग/ अन्य सक्षम खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
५) आयकर, विक्रीकर/जीएसटी भरल्याचा मार्च २०२२ मार्च अखेरचा दाखल निविदेसोबत दाखल करणे आवष्यक आहे.
६) इसारा रक्कम व निविदा फी बाबत कोणतेही सुट मिळणार नाही. ईसारा व निविदा फी भरणा केलेली रिसिप्ट सोबत जोडण्यात यावे.
७) सर्व कागदपत्रे (EMD&FESS,EPF,IT RETURNS, WORK, ESPERIENCE, LICENSE) निविदा सोबत जोडण्यात यावेत.
८) प्राप्त निविदा पैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणत्याही कारणा शिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार न.प.ने. राखुन ठेवला आहे.
९) नगर परिषदेकडून कसल्याही प्रकारची प्राईस इस्केलशन दिले जाणार नाही.
१०) सर्व निविदा धारकांचे EPF चे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे.

(मा.स्वरुप चिरके)
नगर अभियंता
नगर पंचायत जळकोट

(मा.रोहित आरबोळे)
मुख्याधिकारी
नगर पंचायत जळकोट

(मा.प्रभावती कांबळे)
अध्यक्ष
नगर पंचायत जळकोट

# देवदर्शनासाठी गेलेल्या डोईजोडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर





**उदगीर (प्रतिनिधी)** कर्नाटक राज्यातील कलबुर्गी जवळ असलेल्या गाणगापूर येथे उदगीर येथील डोईजोडे कुटुंबीय देवदर्शनासाठी गेले होते. यावेळी भीमा अमरजा नदी संगमात स्नानासाठी गेलेल्या दोघा सख्या भावांचा नदीत बुडून मृत्यू झाला तर डोईजोडे यांचा मुंबईचा मित्रही पाण्यात बुडाल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली.

उदगीर येथील रहिवासी व सध्या मुंबई येथे राहत असलेले सिने दिग्दर्शक व भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. महेश डोईजोडे हे आपल्या मित्रांना सोबत घेवून कुटुंबियांसह मुंबईहून गाणगापूर येथे दर्शनासाठी गेले होते. महेश यांनी भाऊ बाळासाहेब डोईजोडे यांनाही उदगीरहून कुटुंबियांसह गाणगापूरला येण्यासाठी सांगितल्याप्रम ाणे बाळासाहेब व कुटुंबीय उदगीरहून गाणगापूरला पोहचले होते. डोईजोडे व पाटील कुटुंबातील सर्व सदस्य बुधवारी एका लॉजवर थांबले होते. गुरुवारी सकाळी ॲड. महेश डोईजोडे (४७) व भाऊ बाळासाहेब डोईजोडे (४९), मुंबईचा मित्र कैलास पाटील हे तिघ-ेजण गाणगापूरच्या भीमा अमरजा नदी संगमात स्नानासाठी गेले असता ॲड. महेश व बाळास-ाहेब या दोघा भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला तर कैलास पाटील यांच्या तोंडात व पोटात पाणी गेल्यामुळे ते जखमी झाले आहेत. त्यांच्यावर गाणगापूरच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. मयत बाळासाहेब डोईजोडे हे उदगीर येथील शेटकार इस्टेटमध्ये असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राची सेवा करीत होते. गाण-गापूर येथे ॲड. महेश व बाळासाहेब यांच्या प्रेताची उत्तरीय तप-ासणी करून दोघांचेही प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

दोघांही भावांवर आज शुक्रवारी सकाळी ८ वा. उदगीर येथील भावसार क्षत्रिय समाज स्मशानभूम ीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. बाळास-ाहेब व महेश यांच्या पश्चात्य आई, तीन बंधू, एक बहीण, बाळासाहेब यांची पत्नी, एक मुलगी तर महेश यांची पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. डोईजोडे कुटुंबियांच्या दुःखात लोकमन परिवार सहभागी आहे.

# उदगीर नगर परिषद कार्यालय, जि. लातूर

(मालमत्ता विभाग)

जा.क्र.उनप/मा.वि./२२१५/२०२४ - दिनांक २६/०९/२०२४

जाहीर सुचना

उदगीर शहरातील सर्व नागरीकांना याद्वारे सूचीत करण्यात येते की. मा. सर्वोच्च न्यायालया मध्ये रिट याचीका क्र.२१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन (Mise Application क्र. १६९९/२०१९) च्या संदर्भात दिलेल्या मार्गदर्शका सूचना नुसार प्रगत वैदयकीय निर्देशांची अंमलबजावणी करणाऱ्या नागरीकांच्या सन्मानाने मरण्याच्या अधिकारावर परिणाम कण्यासाठी एक यंत्रना निर्माण करण्याचा आदेश पारीत केला आहे. विशेषतः सद्याची याचीका पॅरा.क्र. १९८.३.६ ची अंमलबजावणी करण्यासाठी दाखल करण्यात आले आहे. या आदेशाचा ज्यामध्ये (स्थानिक संस्था) नगर परिषदेवर कर्तव्य बजावण्यासाठी जबाबदारी निश्चित केलेली आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द जनहित याचिका क्र. ०३/२०२४ दाखल केलेली आहे. त्यार्थी उदगीर शहरा करिता खालील प्रमाणे कर्मचारी यांची कस्टोडीयन म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कस्टोडीयनचे नाव पद | श्री. संजय क्षीरसागर |
| पद | सहाय्यक मालमत्ता व्यवस्थापक |
| मोबाईल नंबर | ८३९०७०४४९१ |
| कार्यालयाचे ई-मेल | mcudgir@gmail.com |
| कार्यालयाचा पत्ता | नगरपरिषद संकुल, नांदेड - बिदर रोड, उदगीर ता. उदगीर जि. लातूर |

दिनांक २६/०९/२०२४
स्थळ - उदगीर

स्वाक्षरित /-
मुख्याधिकारी,
नगर परिषद उदगीर

# नगर पंचायत कार्यालय, जळकोट जि.लातूर

जा.क्र.२०२४/न.प.ज/कावि-५ दिनांक २७/०५/२०२४

सुचित करण्यात येते की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविणे योजना अंतर्गत कामाची ई-निविदा Online पद्धतीने https:// mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहेत.

मुख्याधिकारी
नगर पंचायत जळकोट

अध्यक्ष
नगर पंचायत जळकोट

# उदगीर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म. उदगीर, देवणी व जळकोट

४६ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस
( केवळ सभासदांसाठी )

दि. १२-०९-२०२४

उदगीर तालुका जि.प. शिक्षक सहकारी पत संस्था म. उदगीर, देवणी, जळकोट जि. लातूर या संस्थेच्या सर्व मान्यवर सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२३-२०२४ या सहकारी आर्थिक वर्षाची वार्षिक सर्व साधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा. अंकुशे माधव सिद्धप्पा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९-०९-२०२४ रोज रविवार या दिवशी सकाळी ठिक ११-०० वाजता भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय कौळखेड रोड, उदगीर येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :-**
१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २४-०९-२०२३ चे प्रोसेडींग वाचून कायम करणे.
२. दि. ०१-०४-२०२३ ते ३१-३-२०२४ या सहकारी वर्षाचे तेरीज, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक स्विकृत करणे बाबत.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२३-२४ सालाच्या नफा वाटणीस मान्यता देणे बाबत.
४. साल २०२४ - २०२५ साठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
५. साल २०२३ - २०२४ च्या अंदाज पत्रकापेक्षा कमी व जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.
६. साल २०२४ - २०२५ सालासाठी बाहेरील कर्जाची मर्यादा ठरवणे बाबत.
७. लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करणे बाबत.
८. सहाय्यक निबंधक सह.संस्था उदगीर यांच्या कलम ८८ च्या अहवालावर चर्चा करुन पुढील कार्यवाही करणे बाबत.
९. साल सन २०२४-२५ साठी लेखापरीक्षक नियुक्ती बाबत.
१०. प्रभावी थकबाकीदार सभासदावर कलम १०१ ची प्रकरण दाखल करणे बाबत.
११. ऐनवेळी येणारे विषय मान्यवर अध्यक्षांच्या परवानगीने.

सर्जेराव शंकरराव भांगे
सचिव
संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन

ठिकाण : उदगीर
दिनांक : १२-०९-२०२४
टीप :
१) गणपूर्ती अभावी सभेचे कामकाज स्थगीत झाल्यास तीच सभा, त्याच ठिकाणी वरील विषयानुसार ठरविण्यात आलेले कामकाज एका तासानंतर पार पाडण्यात येईल. त्यावेळी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) संस्थेच्या कामकाजाविषयी ज्यांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न दि. २४-०९-२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा रीतीने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
३) क्रियाशील सभासद राहण्यासाठी सर्व साधारण सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.